
रायगड, नवी मुंबई
♦ वर्ष १७ ♦ अंक ३३९
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, २६ जून २०२५ ♦ पाने ८ ♦ किंमत ₹२

## आणीबाणीविरोधात केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव मंजूर



**नवी दिल्ली** : देशात आणीबाणी लावल्याच्या घटनेला ५० वर्षे बुधवारी (दि. २५) पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर भाजपने देशभरात या आणीबाणीचा निषेध करत काँग्रेसवर जोरदार टीका केली. अशातच केंद्रीय मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत आणीबाणीविरोधात प्रस्ताव सादर करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह उपस्थित मंत्र्यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिले तसेच आणीबाणीतील बळींना श्रद्धांजली वाहत दोन मिनिटे मौन पाळले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत १९७५मध्ये लादलेल्या आणीबाणीचा तीव्र निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला. आणीबाणीला ५० वर्षे झाल्यानिमित्त लोकशाहीचे आणि संविधानाच्या मूल्यांचे रक्षण करण्याचा पुनरुच्चार करत हा ठराव मंजूर करण्यात आला.

अंतरंग
महावितरणच्या कार्यवाहीनंतर खारघरचा वीजपुरवठा पूर्ववत/२
नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव मिळणार/६
भालाफेकपटू नीरज चोप्राला सुवर्णपदक/८

# मोदी सरकारचे महिलांना पाठबळ

## भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांचे उद्‌गार

**नागोठणे : बातमीदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलावर्गाच्या जीवनात बदल घडवून विविध विकासात्मक योजना आणल्या. मोदी सरकारने महिलांना पाठबळ देत सुखी व आनंदी केले, असे उद्‌गार भाजप महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांनी नागोठणे येथील जिल्हा महिला मेळाव्यात काढले.

मोदी सरकारने यशस्वी ११ वर्षे पूर्ण केली आहेत. या पार्श्वभूमीवर विश्वरूप प्रतिष्ठानच्या उपक्रमांतर्गत महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी नागोठणे येथील टीएसके सभागृहात भाजप दक्षिण रायगड जिल्हा महिला मेळाव्याचे आयोजन बुधवारी (दि. २५) करण्यात आले होते. त्या वेळी आमदार चित्र वाघ यांनी महिलांशी संवाद साधून मार्गदर्शन केले.



मेळाव्यास भाजप दक्षिण जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, विश्वरूप प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा व भाजप जिल्हा सरचिटणीस सतिश धारप, प्रतिष्ठानच्या अध्यक्ष रोहिणी धारप, भाजप नेते आस्वाद पाटील, महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष डॉ. मंजुषा कुद्रीमोती, रजिपच्या माजी अध्यक्ष नीलिमा पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, ॲड. पल्लवी तुळपुळे, पेणच्या नगराध्यक्ष प्रितम पाटील, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष शर्मिला पाटील, माजी जिल्हाध्यक्ष हेमा मानकर, चित्रा पाटील, ज्येष्ठ नेते अनंत वाघ, रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, युवा नेते निखिल मढवी, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष अपर्णा सुटे, प्रियांका पिंपळे, शेखर गोळे, अशोक अहिरे, ज्ञानेश्वर शिर्के आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, विश्वरूप प्रतिष्ठानचे प्रतिनिधी व बहुसंख्येने महिलावर्ग उपस्थित होता. **(पान २ वर..)**

# लोकशाही भक्कम करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करूया!

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकशाही भक्कम करण्यासाठी आपण एकत्र येऊया, लोकशाही जागृत ठेवण्याकरिता सारे मिळून प्रयत्न करत राहूया, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि. २५) येथे केले. आणीबाणी कालावधीत लोकशाहीच्या लढ्यांमध्ये बंदिवास भोगावा लागलेल्या मान्यवरांचा सन्मान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन पनवेल येथील आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.




कार्यक्रमास महापालिका कार्यक्षेत्रातील आणीबाणी कालावधीत बंदिवास भोगावा लागलेले सात मान्यवर, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, महापालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजप शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, स्वरूप खारगे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, डॉ. रूपाली माने, सुबोध ठाणेकर आणि नागरिक उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, आणीबाणीच्या काळात लोकशाही पुनर्प्रस्थापित करण्यासाठी, अन्याय-अत्याचार थांबविण्यासाठी ज्यांनी सक्रिय भूमिका बजावली अशा मान्यवरांच्या कर्तृत्वाचा पनवेलकरांना निश्चितपणे अभिमान आहे. **(पान २ वर..)**



**पुणे : आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील यांनी आषाढी एकादशी सोहळ्यासाठी पंढरपूरला निघालेल्या वारीत सहभागी होत संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. त्यांच्यासमवेत भाजप पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, अनुसूचित जाती सेल रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, अजय बहिरा, शिवकर सरपंच आनंद ढवळे, प्रितम म्हात्रे, रूपेश नागवेकर, स्वप्नील ठाकूर आदी उपस्थित होते.**

## आणीबाणी विशेष स्मरण प्रदर्शन

या विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तळमजल्यावर 'आणीबाणी विशेष स्मरण प्रदर्शन' २ जुलपर्यंत भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांच्या हस्ते झाले. यामध्ये स्वाक्षरी मोहीम राबविण्यासाठी खास बोर्डची सोय करण्यात आली आहे. या बोर्डवर मान्यवरांनी तसेच महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वाक्षरी केली. देशात २५ जून १९७५ ते ३ मार्च १९७७ या कालावधीत आणीबाणी घोषित



करण्यात आली होती. या घटनेला ५० वर्षे पूर्ण होत असताना भरविण्यात आलेल्या या विशेष प्रदर्शनाला महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडक

### वाढीव मतदानासंदर्भातील याचिका हायकोर्टाने फेटाळली

**मुंबई :** राज्यातील विधानसभा निवडणुकीत मतदानावेळी सायंकाळी ६नंतर ७६ लाख मतदारांचा आकडा रहस्यमयरित्या वाढल्याचा दावा करीत वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी याबाबत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आंबेडकर यांची याचिका फेटाळली.

### ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्लाचे अंतराळ स्टेशनच्या दिशेने उड्डाण

**फ्लोरिडा** : भारतीय वायूदलातील ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था नासाच्या फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून अक्सिऑम-४ या मोहिमेंतर्गत अंतराळ स्थानकाच्या दिशेने उड्डाण केले. नासाचे फॉल्कन-९ हे यान बुधवारी दुपारी १२.०१ वाजता अवकाशात झेपावले.

### राज्यात प्रथमच पाच वर्षांत २६ टक्के वीजदर होणार कमी

**मुंबई** : राज्याच्या इतिहासात प्रथमच पहिल्या वर्षी १० टक्के आणि टप्प्याटप्प्याने कपात करीत पाच वर्षांत २६ टक्के वीजदर कमी होणार आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने महावितरणच्या याचिकेवर हा निकाल दिला.

## सीबीएसई दहावीची परीक्षा आता वर्षातून दोनवेळा होणार

**मुंबई** : सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने सन २०२६पासून दहावीची बोर्ड परीक्षा वर्षातून दोनवेळा घेण्यास मंजुरी दिली. अंतरिम मूल्यांकन केवळ एकदाच केले जाणार आहे. दहावी बोर्डाच्या परीक्षेसाठी पहिल्या टप्प्यातील परीक्षेला हजर राहणे बंधनकारक आहे, तर दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा पर्याय म्हणून आहे, असे सीबीएसई परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांनी सांगितले. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेत सुधारणा करण्याची संधी मिळणार आहे.

## गव्हाण विभागात उद्या मोफत वह्यावाटप कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य क्षेत्रात गेली ३० वर्षे उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप उलवे नोड २ यांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विभागातील गरजू विद्यार्थ्यांना मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २७) मोफत वह्या वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह विभागातील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. सकाळी ११ वाजता शिवाजीनगर राजिप शाळा, ११.३० वाजता कोपर राजिप शाळा, दुपारी १२ वाजता शेलघर राजिप शाळा, १ वाजता गव्हाण कन्या व राजिप शाळा, तर २ वाजता बेलपाडा राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

## संस्कृती विशेषांकाचे प्रकाशन



पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या २०२४-२५ संस्कृती विशेषांकाचे प्रकाशन 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले. या वेळी त्यांनी हा अंक विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीचे उत्तम व्यासपीठ असून दर्जेदार व वाचनीय असल्याचे नमूद केले तसेच महाविद्यालयाला नॅकचे ए+ हे पुनर्मूल्यांकन प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.एन. चांदोरे, उपप्राचार्य डॉ. एस.जी. मेंगाळ, प्रा. सैंदनशिव, प्रा. एस.ए. फुंदे, श्री. आहेर, श्री. म्हात्रे, श्री. निकम, श्री. काकडे उपस्थित होते.



## निवडक

### थकबाकी भरण्याचे आवाहन

**कल्याण :** महावितरणच्या कल्याण परिमंडलात एप्रिल आणि मे या दोन महिन्यांत लघुदाब वीज ग्राहकांकडील (कृषिपंप व कायमस्वरुपी वीज खंडित ग्राहक वगळून) वीजबिल थकबाकीत तब्बल २१० कोटी रुपयांची भर पडली आहे. याव्यतिरिक्त मार्च २०२५ अखेरची २५ कोटी २३ लाख रुपयांची थकबाकी तसेच जून महिन्यातील १०८ कोटी ७६ लाख रुपयांची चालू थकबाकी वसुलीचे मोठे आव्हान कर्मचाऱ्यांसमोर आहे. थकीत व चालू वीजबिल तसेच सुरक्षा ठेवीचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले आहे.

### कर्जतमध्ये मोफत आरोग्य शिबिर

**कर्जत :** व्यापारी रणजीत जैन आणि बंधू आणि माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने प्रेमचंद गुलाबचंद जैन आणि रतनीबाई प्रेमचंद जैन यांच्या स्मरणार्थ ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटल दादर-मुंबई व नारी सामाजिक संस्था दादर- मुंबई यांच्या सहकार्याने मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन श्री कपालेश्वर मंदिर कर्जत येथे शुक्रवारी (दि.२७) सकाळी साडे नऊ ते सायंकाळी साडे पाच या कालावधीत करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ घ्यावा. असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे याबद्दल यांनी केले आहे.

### झाड कोसळून एकजण जखमी

**नवी मुंबई :** नेरूळ सेक्टर २ मधील श्रद्धा शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि शिरवणे विद्यालयाच्या प्रवेशद्वाराशेजारील झाडे सोमवारी दुपारी कोसळली. यात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र एक रिक्षा व दुकानांसमोरील शेडचे मोठे नुकसान झाले. तर एक व्यक्ती जखमी झाला. रक्तस्राव झाल्याने त्यास डॉ. डी. वाय पाटील रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी तातडीने भाजपाच्या सुहासिनी नायडू यांनी धाव घेतली. त्यांनी तातडीने नेरूळ विभाग अधिकारी जयंत जावडेकर यांना बोलावून घेतले. अग्निशमन दलाच्या सहाय्याने झाड बाजूला सारून परिसर मोकळा केला.

# आणीबाणीतील बंदीवानांचा सत्कार

## इंदिरा गांधींचे वंशज राहुल गांधींकडून देशात अराजकता -चित्रा वाघ

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतात लागु केलेल्या आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाली त्या निमित्त भारतीय जनता पक्ष दक्षिण रायगड जिल्ह्यातर्फे बुधवारी (दि. २५) अलिबाग येथे लोकशाही संरक्षण दिन समारंभ आयोजित करण्यात आला होता. आणीबाणीत तुरूंगवास भोगलेल्या बंदीवानांचा या समारंभात सत्कार करण्यात आला. या समारंभात प्रमुख वक्तया म्हणून भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र महिला मोर्चा अध्यक्षा आमदार चित्रा वाघ बोलत होत्या.



ज्यांनी भारतात आणीबाणी लादून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेले संविधान पयादळी तुडवले त्या इंदिरा गांधी यांचे वंशज राहूल गांधी आज देशात अराजकता पसरविण्याचा प्रयत्न करत आहेत, अशी टीका आमदार चित्रा वाघ यांनी या वेळी केली.

भाग्यलक्षी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या समारंभास भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, माजी आमदार पंडित पाटील, भाजप रायगड लोकसभा मतदारसंघ प्रमुख सतीश धारप, भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुठ पाटील, कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदुकुमार चाळके, भाजप सहकार आघाडी कोकण विभाग सहसंघटक गिरीश तुळपुळे, भारतीय जनता पक्षाच्या दक्षिण रायगड महिला मोर्चा अध्यक्षा डॉ. मंजुशा कुद्रीमोदी, रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष ॲड. निलीमा पाटील, पेणच्या माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, रायगड जिल्हा परिषदेच्या माजी बांधकाम सभापती चित्रा पाटील, रायगड जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य प्रियदर्शनी पाटील, अशोक वारगे, उदय काठे आदी या वेळी उपस्थित होते.

आणीबाणी लागू करून संविधान मोडित काढण्याचा प्रयत्न केला गेला. त्याविरूध्द लढण्यासाठी लोक जेलमध्ये गेले. अत्याचार सहन केला. त्यांचा सत्कार करण्याचे भाग्य मला लाभले. देशाचे संविधान धोक्यात आहे, असे फेक नरेटीव्ह तयार केले जात आहे. लोकांची दिशाभूल केली जात आहे. त्याविरूध्द लढ सुरू आहे. जे लढत आहेत त्यांना आणीबाणीत बंदिवास भोगलेल्यांनी मार्गदर्शन करावे, असे आवाहन चित्रा वाघ यांनी या वेळी केले. माजी आमदार पंडित पाटील, सतीश धारप, गिरीश तुळपुळे यांनी आपले मनोगत या वेळी व्यक्त केले.

# भाजपचे नेरळमध्ये निषेध आंदोलन

**नेरळ : प्रतिनिधी**

इंदिरा गांधी यांनी लागू केलेली आणीबाणी म्हणजे देशावर लागलेला एक कलंक असल्याची टीका आज भाजपकडून करण्यात आली आहे. आणीबाणीसारख्या अन्यायकारक आणि लोकशाहीची मुस्काटदाबी करणाऱ्या घटनेला आज ५० वर्षे पूर्ण झाली, असेही भाजपकडून सांगण्यात आले असून काँग्रेस पक्षावर हल्लाबोल चढवला. नेरळ भाजप मंडल अध्यक्ष नरेश मसणे यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि.२५) भाजप पक्षाच्या वतीने नेरळ शहरात काँग्रेसविरोधात निदर्शने करण्यात आली.

काँग्रेस पक्षाने २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू केली होती. दरम्यान, ही आणीबाणी म्हणजे लोकशाहीची हत्या असल्याचे भाजपकडून आरोप होत आहे. आज २५ जून २०२५ रोजी या घटनेला ५० वर्षे पूर्ण झाल्याने भाजपकडून राज्यात काँग्रेसविरोधात निदर्शने करण्यात येत असून निषेध नोंदवण्यात येत आहे. दरम्यान, आज या दिनी नेरळ भाजप मंडल अध्यक्ष नरेश मसणे यांच्या नेतृत्वाखाली नेरळ शहर अंबिका भुवन नाका येथे करण्यात आलेल्या या आंदोलनात भाजप ज्येष्ठ नेते बल्लाळ जोशी, दीपक बहेरे, नरेश मसणे, पंढरी हजारे, संतोष शिंगाडे, संदीप म्हसकर, संभाजी गरुड, अरविंद कटारिया, महिला भाजप नम्रता कांदळगावकर, श्रध्दा कराळे यांसह मोठ्या संख्येने नेरळ भाजप पदाधिकारी उपस्थित होते.



# गव्हाण विद्यालयास काव्यसंग्रह भेट


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि सिडकोचे सेवानिवृत्त अधिकारी पद्माकर नाईक यांची कन्या पल्लवी दीपक म्हात्रे यांच्या 'जिंदगी की फतेह' ह्या नैनिताल येथील प्राची प्रकाशनाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या हिंदी भाषेतील काव्यसंग्रहाच्या प्रती विद्यालयास भेट म्हणून सुपूर्द करण्यात आल्या.

'जिंदगी की फतेह' या काव्यसंग्रहाच्या प्रतींचा संच कवयित्री पल्लवी म्हात्रे यांचे पिताश्री बामण डोंगरी येथील रहिवाशी पद्माकर गणपत नाईक यांच्या हस्ते विद्यालयाच्या ग्रंथालयासाठी मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

या वेळी गव्हाण व पनवेल विभातील टंकलेखन व छपाई क्षेत्रातील प्रसिद्ध व्यावसायिक रघुनाथराव देशमुख, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, वरिष्ठ लेखनिक निलेश गोडे, कनिष्ठ लेखनिक चंद्रकांत मढवी, सर्व अध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी प्रस्तावना करताना ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे यांनी कवयित्री पल्लवी म्हात्रे यांचे विषयी गौरवोद्गार काढले.






## कॅन्सर रुग्णांसाठी आता कॅनविनचे व्यासपीठ

**मुंबई : प्रतिनिधी**

एखाद्याला कॅन्सर झाला आहे हे वाक्य ऐकूनच मन सुन्न होते. या कॅन्सर सोबत झुंज देण्यासाठी व कॅन्सर पेशंटची व त्यांच्या नातेवाईकांसाठी अपोलो हॉस्पिटल ने कॅनविनचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, अशी माहिती हॉस्पिटलचे अध्यक्ष दिनेश माधवन यांनी पत्रकार परिषदेत बुधवारी दिली.

कॅनविन म्हणजे, कॅन्सर झाल्यानंतर रुग्ण व त्यांचे कुटुंबीय, कॅन्सर आजाराने वाचलेले रुग्ण, डॉक्टर आणि स्वयंसेवक, समुपदेशक अशा सगळ्यांना एकत्र आणून आधार देण्याचे व्यासपीठ असून कॅन्सर आजारात आता मी एकटा नाही यासाठी कॅनविनचे व्यासपीठ माझ्यासोबत आहे असा आत्मविश्वास त्या पेशंटला व त्यांच्या नातेवाईकाला मिळतो, असे डॉ. ज्योती वाजपेयी व डॉ नीता नायर यांनी सांगितले.

# खारघरमध्ये अभिनय प्रशिक्षण शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर खारघर येथे आयोजित करण्यात आले आहे. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे ३० जून पासून या शिबिराची सुरुवात होणार आहे. या शिबिरामध्ये नाट्य व सिनेक्षेत्रातील दिग्गज मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रामधील नाट्यकलावंतांना अभिनयासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांचा विकास होण्यासाठी योग्य प्रशिक्षण मिळावे याकरिता महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी महापालिकेमार्फत पुढाकार घेऊन आखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेच्या सहकार्यातून सर्वांसाठी विनामूल्य असे हे अभिनय प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे.

शिबिराच्या वेळा आणि उद्घाटन शिबिरासाठी खारघर भागातील रंगकर्मींनी मोठा प्रतिसाद दिला आहे. ३० जून रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत या शिबीराचे उद्घाटन होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे मोठ्या प्रतिसादामुळे सकाळी ९ ते १२ दुपारी १ ते ४ आणि सायंकाळी ५ ते ८ अशा तीन सत्रात शिबिर होणार आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील नाट्य कलाकारांना मोठे व्यासपीठ मिळावे व त्यांमधून पनवेलचे नाव राज्यात सर्वत्र पोहचावे याकरिता नाट्यपरिषद विविध उपक्रम सातत्याने राबवित असते. पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने दोन गटात हे अभिनय शिबिर घेण्यात येणार आहे. यामध्ये पहिला गट वय वर्षे ८ ते १६ व दुसरा गट १६ ते ६० वया पर्यंत आहे. सकाळी व संध्याकाळी अशा दोन टप्प्यात आठ दिवस हे अभिनय शिबिर होणार आहे. शिबिरासाठी प्रत्येक गटामध्ये ३० /३० प्रशिक्षणार्थी आहेत.

संपर्क शिबिरात सहभागी होण्यासाठी शामनाथ पुंडे- प्रमुख कार्यवाह- नाट्य परिषद पनवेल शाखा. (९८२१७५८१४७), स्मिता गांधी (९३२३४८९६९३), वर्षा कुलकर्णी जनसंपर्क अधिकारी पनवेल महानगरपालिका (७७१५८१५१२७) संबंधितांनी या क्रमांकावर अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. या अभिनय शिबिराचा समारोपप्रसंगी ७ जुलैला मान्यवरांच्या उपस्थितीत होईल. सर्व शिबीरार्थींना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

**पनवेलमधील नाट्यकलावंतांना अभिनयाचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण मिळावे याकरिता अशा प्रकारचे शिबिर घेणे आवश्यक आहे आणि त्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेऊन आखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेच्या सहकार्यातून हे अभिनय प्रशिक्षण आयोजित केले आहे. पनवेलमधील अभिनय प्रशिक्षणानंतर याच पध्दतीने खारघरमध्येही अभिनय प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.**

**-परेश ठाकूर, माजी सभागृह नेते तथा उपाध्यक्ष, अ.भा.मराठी नाट्य परिषद**

# उरण कोप्रोली ते श्रीक्षेत्र कार्ला बाईक रॅली

**उरण : बातमीदार**

आई एकविरा मातेचे महात्म्य लक्षात घेता भक्तांना वर्षातून एकदा तरी वारी करण्याच्या दृष्टीने दरवर्षी पावसाळ्यात बाईक रॅली काढली जाते. कोप्रोली गावातील आई एकविरा मातेचे भक्त देवीचंद म्हात्रे यांनी सण २०२२ मध्ये या रॅलीची सर्वप्रथम सुरुवात केली होती. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रविवार दिनांक २२ जून २०२५ रोजी कोप्रोली (उरण )ते श्री क्षेत्र कार्ला (लोणावळा )या मार्गावर भव्य दिव्य असे बाईक रॅली काढण्यात आली.

कोप्रोली गावचे भक्त देवीचंद म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. भाविक भक्तांना या रॅलीतून वेगळाच आनंद, समाधान भेटले असल्याचे रॅलीतल्या भाविक भक्तांनी सांगितले. दरवर्षी बाईक रॅली मध्ये सहभागी होणाऱ्या भाविक भक्तांची संख्या वाढतच आहे. यंदा बाईक रॅलीचे ४ थे वर्ष आहे.यंदा रविवार २२ जून २०२५ रोजी कोप्रोली गावातून बाईक रॅली निघाली असून सकाळी ६:३० वाजता कोप्रोली (उरण) मधील आई एकविरा मंदिरात आरती, सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांना मान वंदना देऊन रॅलीला प्रारंभ, कलोते येथे नाष्टा, दुपारी १२ च्या दरम्यान श्री क्षेत्र कार्ला येथील आई एकविरा मातेचे दर्शन, दुपारी भोजन, एकविरा मंदिराच्या परिसराची साफसफाई, संध्याकाळी ठीक ४ वाजता परतीचा प्रवास अशा पद्धतीने रॅली उत्साहात झाली.



# खारघरचा वीजपुरवठा महावितरणकडून पूर्ववत

**खारघर : रामप्रहर वृत्त**

महावितरणच्या कार्यवाहीनंतर खारघरमधील वीजपुरवठा सुरळीत झाला आहे.

पनवेल शहर विभागांतर्गत भिंगारी उपविभागातील ३३ के व्ही अधिराज उपकेंद्रास पुरवठा करणाऱ्या मुख्य वाहिनीवर २४ जून २०२५ रोजी दुपारी ३ च्या सुमारास फॉल्ट होऊन केबलला आग लागली. त्यासोबत असणारा केबल डक्टमधील इतर केबलसुद्धा आगीच्या भक्षस्थानी पडल्या व सेक्टर २९ येथील मुख्य स्विचिंग उपकेंद्रास पुरवठा करणाऱ्या इतर उच्चदाब वाहिन्या नादुरुस्त झाल्या. त्यामुळे, खारघर येथील टाटा-१ व टाटा-२ तसेच सेक्टर ३५ व सेक्टर ३६ येथील वीजपुरवठा खंडित झाला होता.

महावितरण खारघर उपविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २० तास अविरत काम करून वीजपुरवठा सुरळीत केला. मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल संजय पाटील व वाशी मंडळ चे अधीक्षक अभियंता दीपक पाटील हे स्वतः लक्ष देऊन वीजपुरवठा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले व काम सुरू असलेल्या जागेवर जाऊन कामाची पाहणी केली. अहोरात्र अथक परिश्रम करून बुधवार २५ जून २०२५ रोजी



दुपारी १२ वाजता सर्व फीडर चार्ज करून बाधित झालेल्या वीजपुरवठा यशस्वीरित्या पूर्ववत करण्यात आला आहे.

३३ के व्ही अधिराज फिडर जळाल्यामुळे ३३ केव्ही चे ६ केबल नादुरुस्त झाले होते. १२६ वितरण रोहित्र बाधित झाले होते व २ उपकेंद्र बंद पडले होते, खारघर येथील टाटा-१ व टाटा-२ मधील १२ रोहित्र, एसव्हीकेएम कॉलेज येथील २ रोहित्र बाधित झाला होता. यामुळे, सेक्टर ३५ चा वीजपुरवठा खंडित झाला होता. सर्व केबल डक्ट मध्ये असल्यामुळे व सदर डक्ट कॉंक्रीट रस्ताखाली बंदिस्त असल्याने फॉल्ट शोधणे अत्यंत कठीण होते. तसेच, पूर्ण डक्ट मधून खूप धूर येत होता. अग्निशमन दलाचा मदतीने आग विजावण्यात आली. नंतर खोदकाम करून नादुरुस्त केबल काढून दुसरे नवीन केबल टाकण्यात आले. सदर काम खूप अवघड असुन वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी रात्रभर युद्धपातळीवर काम करून वीजपुरवठा यशस्वीरित्या सुरू केला.

पान १ वरून

## मोदी सरकारचे महिलांना पाठबळ

आमदार चित्रा वाघ मार्गदर्शन करताना पुढे म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शौचालय योजना आणून महिलांची इज्जत वाढविली. महिलांना लखापती केले. बाळंतीण बाईसाठी रजा वाढविल्या. सदृढ बालक जन्माला यावे म्हणून गर्भवती महिलांना पोषण आहार दिला. बाळंतपणासाठी पाच हजार रुपये दिले. महिलांमध्ये सुरक्षितता आणली. मुस्लिम महिलांसाठी सक्षम कायदा केला. महिलांना त्यांचे हक्काचे घर असावे यासाठी पीएम आवास योजना आणली. महिलांच्या चेहऱ्यावर सुख व आनंद दिसण्यासाठी अनेक योजना राबविल्या. या योजना राबविताना सर्वधर्मसमभाव जपला. कॉंग्रेस व त्यांच्या चेल्यांनी मात्र महिलांची फक्त मते घेतली आणि मोदीजींविरोधात डोके भडकविण्याचे काम केले.

खिशात पैसा असणे गरजेचे असते, कारण त्याने आत्मविश्वास मिळतो आणि महिलांमध्ये हा आत्मविश्वास देवाभाऊंनी मिळवून दिला. सामान्यातील सामान्य महिलावर्गाला मोदीसाहेब व देवाभाऊंनी सन्मान मिळवून दिला. आपण भाग्यवान आहोत आपल्याला मोदीसाहेबांसारखा पंतप्रधान आणि देवाभाऊंसारखा मुख्यमंत्री मिळाला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारचे कार्य आपण सर्व घरोघरी नेऊया, असे आवाहन आमदार वाघ यांनी समस्त महिलावर्गाला केले.

खासदार धैर्यशील पाटील, मंजुषा कुद्रीमोती, नीलिमा पाटील, प्रितम पाटील, चित्रा पाटील, शर्मिला पाटील यांचीही समयोचित भाषणे झाली. मेळाव्याचे प्रास्ताविक हेमा मानकर यांनी, तर सूत्रसंचालन ॲड. पल्लवी तुळपुळे यांनी केले.

## लोकशाही भक्कम करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करूया

कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी केले. मनपातर्फे या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध उपक्रमांची त्यांनी या वेळी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी मानले. कार्यक्रमास पनवेलकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, आणीबाणीत बंदिवास भोगलेल्या सरिता प्रभाकर गांधी या आजारी असल्याकारणाने त्या कार्यक्रमास उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यांना महापालिकेच्या वतीने घरी जाऊन सन्मानित करण्यात आले.



## निवडक

### खालचा ओवळा येथे घरफोडी

**पनवेल :** राहत्या घराच्या उघड्या दरवाजावाटे आत प्रवेश करून एका महिलेने घरातील लाखो रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना खालचा ओवळा येथे घडली आहे. सुगंधाबाई गायकवाड यांच्या राहत्या घराच्या उघड्या दरवाजावाटे एका महिलेने आत प्रवेश करून त्यांच्या कपाटातील लॉकरमध्ये ठेवलेले जवळपास एक लाख ३० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### तिजोरीसह ४५ हजार लांबवले

**पनवेल :** वर्कशॉपमधील उघड्या शटरमधून आत प्रवेश करत अज्ञात चोरट्यांनी येथून ४४ हजार ७०० रुपये तिजोरीसह चोरून नेले. अल्ताफ वांगडे हे कोपरखैरणे येथे राहतात. ते पळस्पा फाटा येथे कामावर आले. या वेळी वर्कशॉपचे ऑफिसचे केबिनचे दरवाजे सिक्युरिटी गार्ड यांच्याकडून बंद करायचे राहून गेले होते. ते केबिन उघडून आत गेले असता, सर्वसामान अस्ताव्यस्त पडलेले त्यांना आढळून आले.


### पार्क केलेल्या रिक्षाची चोरी

**पनवेल :** पार्क केलेल्या रिक्षाची चोरी केल्याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नावडे गाव येथे राहणारे आबाजी कचरे यांनी त्यांची रिक्षा युनायटेड ब्रेवरेज कंपनी गेटच्या मोकळ्या जागेत पार्क केली होती. काम संपवून ते रिक्षा उभी केलेल्या ठिकाणी आले असता, त्यांना त्यांची रिक्षा नसल्याचे आढळले. त्यावर त्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### पनवेलमध्ये सरस्वती याग

**पनवेल :** अनुष्ठान मंडळ पनवेल यांच्या वतीने २६ जून ते २८ जून या कालावधीमधे विश्वकल्याणार्थ सरस्वती याग हे अनुष्ठान बल्लाळेश्वर रामजी संस्थान येथे होणार आहे. या कालावधीमधे नित्य होमहवन, अष्टावधानसेवा, दीपोत्सव, महाआरती, मंत्रपुष्प, भजन, पूर्णाहूती आदी कार्यक्रम होणार आहेत. २६ जून रोजी रात्री ०९:३० वा. कोकणगंधर्व स्वराधिराज राजाभाऊ शेंबेकर यांचे सुश्राव्य गायन संपन्न होणार आहे. तरी सर्व भाविकानी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मुलीला पळवले



**पनवेल :** पनवेल बस स्टँण्ड येथून एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्याने त्या व्यक्ती विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. उज्वला उर्फ रोशनी श्रीधर कातकरी (१६ वर्षे १ महिना २० दिवस) वर्ण सावळा, बांधा सडपातळ, उंची चार फुट आठ इंच, केस काळे, डोळे काळे, चेहरा गोल असून अंगात हिरवा व फिक्कट नारंगी रंगाचा फ्रॉक सोबत मोबाईल फोन आहे. या मुलीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सपोनि बजरंग राजपूत यांच्याशी संपर्क साधावा.

# डेब्रिज टाकणाऱ्या गाड्यांवर कारवाई

## ◆ पनवेल महापालिकेतर्फे दंडाची वसुली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतरित्या डेब्रिज टाकून परिसर अस्वच्छ करणाऱ्या दोन गाड्यांवरती महापालिकेच्या वतीने दंडात्मक कारवाई केली असून, यापुढे अशा पध्दतीने महापालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतरित्या कोठेही डेब्रिज टाकताना आढळल्यास त्यांच्यावरती दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले आहे. सोमवार २३ जून रोजी भाग प्रभाग ब कळंबोलीमध्ये रोडपाली विभागात सेक्टर २० कांदळवन परिसरात थ्री व्हिलर



टेम्पो अनधिकृतरित्या डेब्रिज टाकताना आढळला होता. या टेम्पो मालकांवरती दंडात्मक कारवाई करून पाच हजार रूपयांचा दंड वसूल करण्यात आला.

बुधवार २५ जून रोजी सेक्टर २३, मार्बल मार्केट हायवे कामोठे टोलनाक्यांवर डेब्रिज टाकतानाचा ट्रक महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी पकडला असून या ट्रक मालकांवरती दंडात्मक कारवाई करून, पाच हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

या कारवाईवेळी स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, अमित जाधव, संदीप खानावकर प्रवीण पाटील, रसूल बागवान, जीवन पाटील व घंटागाडी सुपरवायझर रवींद्र गोसावी, प्रणित पवार, पालिका कर्मचारी उपस्थित होते.

**आपल्या परिसराची स्वच्छता राखण्यास नागरिकांनी सहकार्य करावे व कोणतेही बांधकामजन्य कचरा अथवा डेब्रिज अधिकृत परवानगीशिवाय सार्वजनिक ठिकाणी टाकू नये.अनधिकृतरित्या डेब्रिज टाकताना आढळल्यास त्यांच्यावरती कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.**

–डॉ. वैभव विधाते, उपायुक्त (घनकचराव स्वच्छता) पनवेल महानगरपालिका

# मित्राकडे कार गहाण ठेवून फसवणूक

**पनवेल :** चालवण्यासाठी दिलेल्या कारचे भाडे वेळेत न देता कार मित्राकडे गहाण ठेवली आणि टी परमीट असताना त्यात बदल करून कारला पांढरी नंबर प्लेट लावून कारचा वापर करून फसवणूक केल्याप्रकरणी तुळशीदास लक्ष्मण तेलंगे (रा. चिखलोली पाडा, अंबरनाथ) याच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मेघा चेंदवणकर या आकुर्ली, वीर पार्क येथे राहतात. त्यांची वेदांत टूर्स अँड ट्रॅव्हल्स नावाची कंपनी आहे. त्यांनी त्यांची कार तुळशीदास तेलंगे यांना चालवण्यासाठी भाड्याने दिली होती. सुरुवातीला त्याने भाडे बँक खात्यात पाठवत होता. त्यानंतर त्याने पैसे देण्यास उशीर केला. त्यामुळे त्याच्याकडून गाडी परत घेण्यात आली व पुन्हा त्याला कार चालवण्यासाठी दिली. दरम्यान, जानेवारी २०२५ मध्ये मेघा यांचे पती अंबरनाथ येथील तेलंगे यांच्या घरी गेले. या वेळी कार मागितली असता ती त्याचा मित्र सोनू याच्याकडे असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी सोनूला विचारले असता, त्याच्याकडे कार गहाण ठेवल्याचे सांगितले.

# उरणच्या वीज समस्यांविषयी महावितरण अधिकाऱ्यांना निवेदन

**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, उरण येथे भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड आणि सहकाऱ्यांनी बुधवारी (दि.२५) रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ उरण कार्यालयात अधिकाऱ्यांची भेट घेऊन वीज समस्यांबाबतचे निवेदन दिले.

उरण नागरिकांवर लाईट बिलचा अतिरिक्त भार पडतो. त्याबद्दल महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ उरणचे अधिकारी विकास गायकवाड, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आणि संतोष ब्राह्मणे सहाय्यक लेखापाल यांना निवेदन देण्यात आले. उरणमधील नागरिकांना जो लाईटचे बिल अतिप्रमाणात येते आणि विज बिल, स्थिर आकार, इंधन आकार काय आहे ते उरणच्या नागरिकांना समजायला पाहिजे आणि त्याच्यातून सर्वसामान्य नागरिकांची पिळवणूक थांबावी, असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते विद्याधर गावंड, तहसील उरण प्रभाकर नवाले, सामाजिक कार्यकर्ते अजय जासूद, युवा नेतृत्व हर्ष गावंड उपस्थित होते.








**पनवेल : लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त पनवेल–उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने पनवेलमध्ये जोड भजनी भारूड आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांनी भेट दिली. पनवेल शहरातील आगरी समाज हॉलमध्ये मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात वडगाव गायक राजेंद्रबुवा जांभुळकर, सुभाष मुकादम व अनिल मुकादम यांचा जोड भजनाचा कार्यक्रम सादर झाला. या वेळी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, दि.बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : श्री श्री रविशंकर प्रणित आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनच्या वतीने राज्यभर सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रा आयोजित करण्यात आली आहे. पनवेल तालुक्यात प्रथमच मूळ ज्योतिर्लिंग दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या अंतर्गत मंगळवारी उलवेमधील भूमिपूत्र भवनात रुद्र पूजा आणि दर्शन सोहळा झाला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेत पूजा केली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, वाय.टी. देशमुख आदी उपस्थित होते.**

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक सीबीएसई स्कूलमध्ये वक्तृत्व स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या वर्ग अंतर्गत फेरीची सुरुवात बुधवारी (दि. २५) कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे मोठ्या उत्साहात झाली.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे कामोठे मंडल अध्यक्ष व माजी नगरसेवक विकास घरत, मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, सामाजिक कार्यकर्त्या हर्जिंदर कौर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्पर्धा प्रमुख मयुरेश नेतकर, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव आदी उपस्थित होते.

या वेळी इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आणि तयारीने विविध विषयांवर भाषणे सादर केली. माझा शाळेतील पहिला दिवस, माझं स्वप्न, प्लास्टिकमुक्त भारत, इंटरनेट: वरदान की शाप अशा अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी विचार मांडले. स्पर्धा अतिशय शिस्तबद्ध रित्या पार पडली. विद्यार्थ्यांनी दाखवलेला आत्मविश्वास व संवाद कौशल्य पाहून उपस्थित पालक आणि शिक्षक भारावून गेले. स्पर्धेतील निवडक विद्यार्थी पुढील शाळा अंतर्गत फेरीसाठी पात्र ठरणार आहेत. वक्तृत्वाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचारसरणी आणि प्रभावी संवाद कौशल्य विकसित होईल, असा विश्वास शाळेच्या शिक्षक व आयोजकांनी व्यक्त केला.

**आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा अंतर्गत झालेल्या वर्ग अंतर्गत फेरीत विद्यार्थ्यांनी सादर केलेले विषय अतिशय वैविध्यपूर्ण आणि महत्वपूर्ण होते. प्रत्येक भाषणात त्यांच्या कल्पकतेचा आणि विचारशक्तीचा सुंदर आविष्कार दिसून आला. विद्यार्थ्यांनी ही स्पर्धा यशस्वी केली असून आता पुढील फेरीसाठी अधिक जोमाने तयारी करत आहेत. वक्तृत्व स्पर्धा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. या उपक्रमासाठी संधी दिल्याबद्दल आम्ही कोशिश फाउंडेशन व पनवेल महानगरपालिकेचे मन:पूर्वक आभार मानतो. त्यांच्या पुढाकारामुळेच विद्यार्थ्यांना स्वतःला व्यक्त करण्याचे हे दर्जेदार व्यासपीठ मिळाले.**

**–अविनाश कुलकर्णी**, मुख्याध्यापक, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे

**मी रामशेठ ठाकूर पब्लिक सीबीएसई स्कूल कामोठे येथे शिकते. मी आमदार श्री प्रशांत ठाकूर चषक वकृत्व स्पर्धेत भाग घेतला आहे. या स्पर्धेच्या दुसऱ्या व तिसऱ्या दोन्ही आवृत्त्यांमध्ये मी सहभागी झाले आहे. मी दोन्ही वेळा वर्ग अंतर्गत स्तरावर प्रथम क्रमांकाची मेडल जिंकली आहे. ही स्पर्धा माझ्यासाठी स्वतःला व्यक्त करण्याचा एक अतिशय सुंदर अनुभव होता.**

**–श्रेया माने**, विद्यार्थिनी, आठवी अ

# विमानतळासंबंधी मोफत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची मागणी

## नेत्रा पाटील यांचे पनवेल मनपा आयुक्तांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी मंगेश चितळे आयुक्त तथा प्रशासक पनवेल महानगरपालिका यांची भेट घेत पनवेल महानगरपालिका क्षेत्रात येऊ घातलेल्या लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने स्थानिक तरुणांसाठी विमानतळाशी संबंधित मोफत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याबाबत निवेदन दिले.



पनवेल महानगरपालिका क्षेत्रालगतच लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यात येत असून ते लवकरच कार्यान्वित होणार आहे. या विमानतळामुळे स्थानिक तरुणांना नोकरीच्या व रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध होणार आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त तसेच स्थानिक तरुण–तरुणींना विमानतळाशी संबंधित अद्ययावत व कौशल्यवर्धक प्रशिक्षण महापालिकेच्या वतीने मोफत स्वरूपात उपलब्ध करून द्यावे. यामुळे प्रकल्पग्रस्त व स्थानिक युवकांना आगामी काळात अधिकाधिक नोकरीच्या व रोजगाराच्या संधी मिळू शकतील. प्रशिक्षणासाठी १. बेसिक एव्हिएशन अवेअरनेस, २. एअरपोर्ट ऑपरेशन्स, ३. एव्हिएशन सिक्युरिटी, ४. कार्गो ऑपरेशन्स, ५. केबिन क्रू, ६. ग्राउंड स्टाफ, ७. हॉस्पिटॅलिटी आणि कस्टमर सर्व्हिस या कोर्सेसचा समावेश करण्यात यावा.

महापालिकेच्या माध्यमातून अशा प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण दिल्यास, स्थानिक तरुणांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार आणि अद्ययावत कौशल्यांच्या आधारावर दर्जेदार नोकरीच्या संधी सहज उपलब्ध होतील.

या मागणीचा सकारात्मक विचार करत आयुक्त मंगेश चितळे यांनी समाज विकास अधिकारी स्वप्नाली चौधरी यांना याबाबत आढावा घेण्यात सांगून लवकरच सदर प्रशिक्षण देण्यात येईल, असे आश्वासित केले. समाज विकास अधिकारी स्वप्नाली चौधरी यांनी माननीय आयुक्तांच्या आदेशानुसार विमानतळ प्राधिकरणाकडे पत्र व्यवहार केलेला असून त्यांच्याकडून ही अधिकचे काही कोर्सेस अथवा प्रशिक्षण घेण्यासंदर्भात माहिती घेऊन नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी दिलेले कोर्सेस व विमानतळ प्राधिकरणाकडून आलेल्या प्रशिक्षण अथवा कोर्सेसचा एकत्रित विचार केला जाईल, असे सांगितले.

निवेदन देतेवेळी खारघर भाजपा मंडल उपाध्यक्ष किरण पाटील हेदेखील उपस्थित होते.

# दुकान फोडून मोबाईल्सची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर ११ मध्ये अज्ञात इसमाने मोबाईलच्या दुकानाचे शटर उचकटून दुकानातून १० डेमो मोबाईल, २ ग्राहकांचे मोबाईल व १४ हजार रुपयांची रोकड असा एकूण एक लाख ३९ हजार १५० रुपयांचा एवज लंपास केला आहे.

सुयश व्यवहारे यांचे कळंबोली सेक्टर ११ मध्ये मोबाईल प्लॅनेट नावाचे दुकान आहे. सुयश हे रात्री दुकान बंद करून घरी गेले असता अज्ञात इसमाने रात्रीच्या सुमारास त्यांच्या दुकानाचे शटर उचकटून एक लाख ३९ हजार १५० रुपयांचा ऐवज लंपास केला.

सुयश हे सकाळी दुकान उघडायला आल्यावर त्यांना दुकानाचे शटर विचित्र अवस्थेत आढळून आल्याने दुकानात चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात धावून घेऊन अज्ञात चोरट्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

दरम्यान, अशाप्रकारे दुकाने फोडण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. त्यामुळे चोरट्यांना पकडण्याचे आव्हान पोलिसांसमोर निर्माण झाले आहे.



**पनवेल : भाऊसाहेब ढोले हे नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ २ अंतर्गत (पनवेल विभाग) सहाय्यक पोलीस आयुक्तपदी रुजू झाल्याबद्दल क्रियाशील प्रेस क्लबतर्फे रायगड जिल्हाध्यक्ष सय्यद अकबर यांनी सहकाऱ्यांच्या समवेत त्यांचा पनवेल कार्यालयात सत्कार केला. या वेळी प्रा. ॲड. मोहन गायकवाड, कार्याध्यक्ष राज भंडारी, सचिव साबीर शेख, कोषाध्यक्ष चंद्रकांत शिर्के, गणपत वारगडा, विशाल सावंत, अनिल राय, भूषण साळुंखे, रवींद्र गायकवाड, अनिल कुरघोडे, असीम शेख आदी पत्रकार उपस्थित होते.**

## संपादकीय

# काळ्या अध्यायाचे स्मरण

२५ जून १९७५. देशाने पाहिलेल्या एका काळ्याकुट्ट कालखंडाची आठवण या दिवसाशी निगडित आहे. याच दिवशी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणी जाहीर केली आणि देशाला महत्प्रयासाने लाभलेली लोकशाही पायदळी तुडवणारा २१ महिन्यांचा कालखंड सुरू झाला. लोकशाहीचे महत्त्व जाणण्यासाठी आणीबाणीचे स्मरण केलेच पाहिजे.

**आणीबाणी म्हणजे भारतीय संविधानास लक्ष्य करणारा काळाकुट्ट कालखंड. या आणीबाणीला बुधवारी, २५ जून रोजी पन्नास वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने लोकशाहीचे व संविधानाचे महत्त्व अधोरेखित व्हावे या हेतूने अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. आणीबाणीमध्ये भारतीय संविधानाची कशी हत्या करण्यात आली याविषयी विशेषत: नव्या पिढीला माहिती व्हावी हा या कार्यक्रमांमागील हेतू आहे. 'डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी रिसर्च फाऊंडेशन' तर्फे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की लोकशाही हा भारताचा जनस्वभाव आहे. पण आणीबाणीच्या काळात लोकशाहीला पायदळी तुडवण्यात आले. भारतीय संविधानाचा पाया अतिशय बळकट आहे. त्यामुळेच हुकूमशहांनी संविधानाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न केल्यास काय होते हे भारतीय जनतेने तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना लागलीच दाखवून दिले होते. आणीबाणीद्वारे देशात एकाच विचाराचे आणि एकाच राजकीय पक्षाचे सरकार आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु भारतीय संविधानाचा पाया बळकट असल्याने या प्रयत्नांना यश मिळाले नाही. आणीबाणीत संविधानाचाच वापर करून संविधानाची हत्या करण्याचा प्रयत्न झाला होता. मात्र, लोकशाहीची जननी असलेल्या देशात बहुपक्षीय लोकशाहीच योग्य आहे ही अतिशय महत्त्वाची शिकवण आणीबाणीमुळे देशातील सर्वच राजकीय पक्षांना मिळाली असे आणीबाणीचे समर्पक विश्लेषण शाह यांनी या कार्यक्रमात केले. एका पाठोपाठ एक घटनांमधून देशात जनतेचा असंतोष उफाळून येत असताना इंदिरा गांधी यांनी राजनारायण यांच्याविरोधातील निवडणूक गैरप्रकार करून जिंकली असा निकाल अलाहाबाद उच्च न्यायालयाने १९७५ मध्ये दिला. इंदिरा गांधी सर्वोच्च न्यायालयात गेल्या आणि निकालाला अंशिक स्थगिती मिळाली. या पाठोपाठ देशातील विरोधी पक्षांच्या नेत्यांनी बेबंदशाहीविरोधात संघर्ष सुरू केला व संपूर्ण क्रांतीची घोषणा केली. दिल्लीच्या रामलीला मैदानावर २५ जून १९७५ रोजी एक रॅली आयोजित करण्यात आली होती. जयप्रकाश नारायण व अटलबिहारी वाजपेयी हे दोन नेते या रॅलीच्या केंद्रस्थानी होते. इंदिरा गांधी यांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी या रॅलीत करण्यात आली. पण त्यानंतर दुसऱ्या दिवसाची सकाळ उजाडली ती आणीबाणीची बातमी घेऊन. इंदिरा गांधी यांनी सर्वाधिकार आपल्या हाती घेतले व जनतेची सर्व स्वातंत्र्ये स्थगित केली. आणीबाणीत विरोधातील राज्य सरकारे बरखास्त केली गेली, विरोधी नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले. आणीबाणीला पन्नास वर्षे पूर्ण झाली या निमित्ताने अनेकांनी त्या अंध:कारमय कालखंडाच्या आठवणी बुधवारी सांगितल्या. या काळात व्याख्याने, परिसंवादांवर मनाई आली. लोकांना व्यक्त होणे नाकारण्यात आले. यातूनच लोकांना पुन्हा आपल्या स्वातंत्र्याचे मोल जाणवले. पाठोपाठ झालेल्या १९७७च्या निवडणुकीत लोकांनी सर्व बंधने झुगारून मतदान केले आणि तेव्हाची सत्ताधारी काँग्रेस भुईसपाट झाली. भारतीय लोकशाहीतील नागरिक निर्बुद्ध नाहीत हे स्पष्ट झाले. आणीबाणीच्या त्या काळ्याकुट्ट कालखंडातून भारतीय लोकशाही तावूनसुलाखून बाहेर पडली. म्हणूनच संविधानाने देशातील सर्वसामान्यांना दिलेल्या स्वातंत्र्याची जपणूक करण्यासाठी आणीबाणीचे स्मरण केलेच पाहिजे.**

# रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज

आपले राजेपण हे मिरविण्यासाठी नसून लोकांच्या सेवेसाठी आहे. राजेपद हे शाहू महाराजांच्या दृष्ट नगण्य होते, मात्र लोकसेवेसाठी ते टिकविणे जरूरी होते. त्यातूनच राजर्षी शाहू महाराजांनी लोकसेवेचा नवा आदर्श निर्माण केला. अफाट कर्तृत्ववान असलेला हा राजा. ज्याच्या कार्यकर्तृत्वाला मर्यादा नव्हत्याच. त्यांची कार्यशक्ती जबरदस्त होती. ध्येय दृष्टी निश्चित होती. सुक्ष्म निरीक्षण आणि दाट अवलोकन यांचे सुयोग्य मिश्रण होते, म्हणूनच ते लोकनेता होते.



२६ हा त्यांचा जन्मदिवस. पुरोगामी महाराष्ट्रात हा दिवस 'सामाजिक न्याय दिन म्हणून मोठ्या गौरवाने साजरा केला जातो. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यकर्तृत्वातील एक छोटीशी घटनाही त्यांच्या अफाट कार्याची महती सांगून जाते.

राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या तीन महान व्यक्तींमुळे आपणास सामाजिक न्यायाचा पाठ अनुभवयास मिळातो. सामाजिक समतेची एक मोठी शिकवण यांनी आपणास दिली. यातील प्रत्येकाचे कार्य हे आभाळापेक्षाही मोठे आहे. असे म्हटले तर ते अतिशयोक्ती नसेल.

आपल्या जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी, उन्नतीसाठी जे-जे काही करता येईल त्या-त्या बाबींकडे अत्यंत जागरुकतेने लक्ष देऊन त्यांची पूर्तता करण्याचे काम राजर्षीनी केले. शिक्षण, सामाजिक समता, जाती निरपेक्षता यांच्याकडे पाहण्याची ज्यांची दृष्टी ही खूप वेगळी व तेजस्वी होती. शिक्षण, समाज, धर्म, हक्क, अर्थ अशा विविध घटकांचा विचार करून राजर्षी शाहू महाराज लोकसेवा करीत असत.

**स्वयंप्रेरणेचा मंत्र**

स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात जेव्हा आपण ब्रिटीशांच्या गुलामगिरीत होतो. त्यावेळी ती नष्ट करण्यासाठी असलेल्या डोळस नेतृत्वाच्या गरजेबद्दल राजर्षी शाहू महाराजांचे सडेतोड आणि स्पष्ट विचार सर्व काही सांगून जातात. हिंदुस्थानातील जीवघेणी गुलामगिरी नष्ट करण्यासाठी तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातीभेद मोडून आम्हास मनुष्याप्रमाणे वागवतील असे पुढारी पाहिजेत. अस्पृश्यांसाठी काय? किंवा इतर कोणासाठी काय? कुठलीही विधायक गोष्ट घडवायची असेल तर कृतीशील मानवतावादी पुढारीच हवा आहे, असे ते म्हणत. कुणावरही न विसंबता स्वत:च स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा 'स्वंयप्रेरणेचा मंत्र' हा शाहू महाराजांच्या कार्याचा मूलमंत्र आहे.

राजर्षी शाहू महाराजांच्या भाषणांच्या टीकाटिप्पणीसह चिकित्सक अभ्यास असलेल्या क्रांतिसुक्तेः 'राजर्षि छत्रपती शाहू' या ग्रंथाच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष य. दि. फडके यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, आधुनिक काळात महाराष्ट्राची जडणघडण करणाऱ्या महान नेत्यांमध्ये कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज यांचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकोणिसाव्या शतकात महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्वाभिमानाचे व समतेचे बी पेरुन जो वृक्ष लावला त्याला खतपाणी घालून काळजीपूर्वक वाढविले ते शाहू छत्रपतींनी. या वृक्षाला कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव जेधे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्वाच्या रुपाने पुढील काळात नवनवीन धुमारे फुटले. शेकडो वर्षे जे ज्ञान, सत्ता, संपत्ती यापासून वंचित राहिले त्यांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे, शिकता यावे आणि विकासाच्या वाटा खुल्या व्हाव्यात असा शाहू छत्रपतींनी आयुष्यभर ध्यास घेतला होता. राजकीय स्वराज्य मिळविण्याचा प्रश्न त्यांना गौण वाटला. सामाजिक व धार्मिक समतेची प्रस्थापना करण्याच्या प्रश्नाला त्यांनी नेहमीच अग्रक्रम दिला.

लोकनेता राजर्षी शाहू महाराज यांनी अनेक वेळा आपले विचार लोकांच्या समोर अत्यंत प्रखरतेने व प्रगटपणे मांडले. त्यांच्या प्रत्येक भाषणातून लोकांच्याप्रती, समाजाच्याप्रती असलेला त्यांचा आप्तपणाचा भाव स्पष्टपणे दिसून येतो. अशाच एका भाषणाच्या प्रसंगी ते म्हणतात, आपण मला आज आपला असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे शेवटपर्यंत प्रेम दृढ ठेवा, मी देखील कितीही अडचणी आल्या, कितीही त्रास झाला, तरी त्याला न जुमानता उन्नतीच्या महात्कार्यास शक्य तेवढा हातभार लावण्यास कधीही माघार घेणार नाही, असे आश्वासन देऊन मी आपले भाषण संपवितो. राजर्षींच्या कार्याची आठवण आपणास सदैव असण्याकरीता त्यांच्या जन्मदिनी साजरा होणारा हा सामाजिक न्याय दिन आहे.

**–डॉ. राजू पाटोदकर**

(संदर्भ– क्रांतिसुक्ते राजर्षि छत्रपती शाहू संपादक डॉ. एस.एस. भोसले)

# नारायण श्रीपाद राजहंस तथा बालगंधर्व

राष्ट्रपिता महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, पंडित नेहरू, राजर्षी शाहू महाराज व घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आधुनिक भारताच्या जडणघडणीत कार्यमग्न असताना या महापुरुषांना आपल्या आवाजाने थोडातरी विरंगुळा देत विसावा देऊन मंत्रमुग्ध करणारे सुरांच्या दुनियेतील अनिभिषिक्त सम्राट म्हणजे बालगंधर्व तथा नारायण श्रीपाद राजहंस.

रंगभूमीवरील आपल्या पाच दशकांच्या कारकिर्दीत नाट्यप्रेमींना आपल्या मोहात पडणाऱ्या या नटसम्राटाचा जन्म २६ जून १८८८ला पुण्यात झाला. त्याचे आजोबा कृष्णाजीपंत यांना पाच अपत्ये होती. त्याचे मुळगाव नागोठाणे, सातारा हे होय. श्रीपादरावांचा विवाह अन्नपूर्णाबाई यांच्याशी झाल्यानंतर त्यांना पुढे सात अपत्य झाली, पण ती अल्पायुषी ठरली असल्याने नारायण रावांच्या जन्माच्या वेळी त्यांचे वडील चिंताग्रस्त होते. श्रीपादराव हे स्वतः सतारवादक होते. शिवाय सरकारी खात्यात नोकरीला असल्यामुळे घरची परिस्थिती संपन्न होती. त्या काळात नाटकाचा बोलबाला असल्याने बालपणीच नारायणवर संगीत कलेचे संस्कार रुजले. आपली भावंडे शंकर, वेणू, व व्यंकटेश झोपी गेली असतानाही नारायण मात्र नाटक संपेपर्यंत विस्फारलेल्या नजरेने बघत असत.



नारायणाची संगीतातील रुची पाहून वडलांनी त्यास शिक्षणासाठी बहिणीच्या मुलीकडे पाठवले. तिथे मेहबूब खाँ यांच्याकडे गायनाचे सुरुवातीचे धडे गिरवले. याच काळात काका यशवंत यांच्याकडे सहज म्हणून पुण्याला फिरण्यासाठी गेले असता 'केसरी' या वर्तमानपत्राकडून गाण्याचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. काका वर्तमानपत्रात काम करत असल्याने नारायणास तिथे जाण्याची संधी मिळाली. त्या कार्यक्रमात गायलेल्या 'हरवा मोरा देव बंधवा', 'ना तर मै गारी दुंगी, ना रहुंगी तुम्हीसो बलमा' हे गीत गायल्यानंतर लोकमान्यांनी त्यास 'बालगंधर्व' ही पदवी बहाल केली. केसरीच्या पहिल्या पानावर झळकत नारायण संपूर्ण महाराष्ट्रभर 'बालगंधर्व' नावाने प्रसिद्ध झाले.

या काळातच 'किर्लोस्कर नाटक कंपनीत' नशीब अजमावण्यास गेलेल्या 'बालगंधर्वास' अपयश आले. त्यांनतर ताहराबादकर गुरुजी व कोल्हापूरचे अपय्यबुवाकडे संगीतकलेचे ज्ञान संपादन केले. पुढे १९०५च्या दरम्यान 'किर्लोस्कर कंपनीत', 'शकुंतला'च्या स्त्री रूपातील भूमिकेतून नाट्यविश्वातील एका नाटकीय कारकीर्दीचा 'श्री गणेशा' केला. शकुंतला, शारदा, नंदिनी, सुभद्रा, द्रोपदी, सिंधू, भामिनी, रुक्मिणी, रेवती, अशा स्त्रियांच्या एकाहून एक अधिक सरस भूमिका त्यांनी साकारल्या, ज्या काळात भारतीय स्त्रीची समाजात अत्यंत दयनीय अवस्था होती. 'संगीत शकुंतला' या नाटकातील शकुंतला व मानापमान मधील 'भामिनी' या भूमिकेने तर ते प्रेक्षकांच्या गळ्यातील ताईतच बनले होते. नेहमी चेहऱ्यावर शांत भाव व स्मित हास्य असणाऱ्या बालगंधर्वाचे अर्धांगवायूच्या झटक्याने वयाच्या ७९व्या वर्षी १९६७ साली निधन झाले. (संकलन : नितीन जाधव)

## बदलते तंत्रज्ञान

# जगातील पहिल्या इलेक्ट्रिक विमानाची यशस्वी चाचणी

विमानाने प्रवास करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. लवकरच तुमचा विमान प्रवास स्वस्त होणार आहे, जगातील पहिल्या प्रवासी इलेक्ट्रिक विमानाची नुकतीच अमेरिकेत यशस्वी चाचणी घेण्यात आली. हे विमान बीटा टेक्नॉलॉजीज नावाच्या कंपनीद्वारे चालवले जात आहे. काही दिवसांपूर्वी हे विमान ईस्ट हॅम्प्टनहून न्यू यॉर्कच्या जॉन एफ. केनेडी आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेले होते. हा प्रवास यशस्वी झाला आहे. यामुळे आता इलेक्ट्रिक विमान मिळणार आहेत.



चाचणीदरम्यान या इलेक्ट्रिक फ्लाइटने फक्त ३० मिनिटांत सुमारे ७० नॉटिकल मैल म्हणजेच १३० किमी अंतर कापले. बीटा टेक्नॉलॉजीजचे संस्थापक आणि सीईओ काइल क्लार्क हे चाचणी घेत होते. हे विमान १०० टक्के इलेक्ट्रिक आहे. हे १०० टक्के इलेक्ट्रिक विमान आहे. ते प्रवाशांसह ईस्ट हॅम्प्टन ते जेएफकेपर्यंत उड्डाण केले. आम्ही ३५ मिनिटांत ७० नॉटिकल मैल अंतर कापले, असेही काइल क्लार्क म्हणाले.

मिळालेल्या माहितीनुसार संपूर्ण विमान चार्ज करण्यासाठी आणि प्रवास पूर्ण करण्यासाठी फक्त आठ डॉलर्स म्हणजेच सुमारे ७०० रुपये खर्च आला. हेलिकॉप्टरमधून प्रवास करण्यापेक्षा ही किंमत स्वस्त आहे. सामान्य हेलिकॉप्टरद्वारे या अंतरासाठी इंधनावर सुमारे १६० डॉलर्स खर्च होतात. एकदा चार्ज केल्यानंतर विमान २५० नॉटिकल मैलांपर्यंत प्रवास करू शकते.

क्लार्क म्हणाले की, शहरे किंवा शहरांमधील लहान प्रवासासाठी इलेक्ट्रिक विमाने स्वस्त असू शकतात. कमी खर्च आणि शांततेमुळे, ते प्रवाशांमध्ये लोकप्रियदेखील होऊ शकते. कंपनीला वर्षाच्या अखेरीस यूएस फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशनकडून प्रमाणपत्र मिळण्याची आशा आहे.

काही वेळा विमान प्रवासात इंधनाचा तुटवडा जाणवतो. मोठ्या प्रवासात जाणाऱ्या विमानांना अधिकचे इंधन लागते. इंधन संपत आल्यावर आणीबाणीचा प्रसंग उद्भवू शकतो. अशा वेळी इमर्जन्सी लँडिंग करावे लागते. मिळेल त्या विमानतळावर उतरावे लागते, पण तिथेही तेव्हा लगेच जागा उपलब्ध होतेच असे नाही. या इंधनाचा ताप वाचवण्यासाठी इलेक्ट्रिक विमान आले आहे.

# प्रतिभावंत लेखक व.पु. काळे

वसंत पुरुषोत्तम उर्फ व.पु. काळे हे मराठी भाषेतील लेखक, कादंबरीकार, कथाकथनकार होते. त्यांचा जन्म २५ मार्च १९३२ रोजी झाला. त्यांचे विचार साहित्य रसिकांमध्ये खूप प्रसिद्ध आहेत. हसता हसता डोळ्यात पाणी आणणारा असा त्यांचा विनोद असे. विशेषत: तरुणाईच्या मनावर वपुंनी आपल्या लेखनाच्या माध्यमातून गारूड केले होते. जगणे हीसुद्धा एक कला आहे, ती आपण अवगत करायला हवी, असा संदेश ते अगदी सहज देऊन जात असत. व.पु. या दोन शब्दावर तमाम रसिक अजूनही प्रेम करत आहेत. त्यांचे विचार आदानप्रदान करत आहेत.



**निमित्त**

व.पु. मुंबई महानगरपालिकेत होते. पेशाने वास्तुविशारद होते, पण वास्तू साकारताना त्यांनी किती सुंदर सुंदर पुस्तके आपल्या मराठी मातृभाषेत लिहिली याला तोड नाही. वपुंचे मराठी लिखाण सामान्य माणसाच्या जीवनाला भिडणारे, समृद्ध करणारे आहे. आपण सारे, अर्जुन, गुलमोहर, गोष्ट हातातली होती, घर हरवलेली माणसं, दोस्त, माझ्या माझ्यापाशी, मी माणूस शोधतोय, वन फोर द रोड, रंग मनाचे, माणूस, वपुर्झा, हुंकार असे पत्रसंग्रह, ललितप्रकार खूपच प्रसिद्ध आहेत तसेच तप्तपदी ठिकरी व वाट एकटीची यासारख्या कादंबऱ्या खूपच गाजल्या.

वपुंनी ६०पेक्षा जास्त पुस्तकांचे लिखाण केले. त्यातील पार्टनर, वपूर्झा, ही वाट एकटीची यांचे कथाकथन त्यांनी स्वतः केलं. या कथाकथनाला प्रेक्षकांनी भरपूर दाद दिली आणि ऑडिओ कॅसेटमधून घराघरात पोहोचणारे वपु पहिले लेखक ठरले. पेशाने आर्किटेक्ट असणारे वपु इमारतींच्या आराखड्याचे रेखन करण्यापेक्षा लेखन करू लागले आणि मराठी साहित्याला एक थोर साहित्यिक लाभला.

वपुंचं लिखाण चौफेर होतं. कथा, ललित, नाटक, वैचारिक, चरित्र, आत्मचरित्र्य असे सर्व लेखन प्रकार त्यांनी हाताळले. त्यांच्या कथा जिवंत माणसांच्या, नातेसंबंधांच्या, स्वैर वेड्या मनाचे विविध कंगोरे अधोरेखित करणाऱ्या असत.

पेशाने आर्किटेक्ट असणाऱ्या 'वपुं'नी कथा आणि कादंबरी लेखन तर केलंच पण आकाशवाणी आणि दूरदर्शनसुद्धा आपल्या छोट्या छोट्या प्रहसनांनी गाजवलं. श्रोत्यांवर गारूड घालणारं कथाकथन म्हणजे तर त्यांचा हातखंडा पैलू! त्यांनी आपल्या खास शैलीत १५००हून अधिक कथाकथनाचे कार्यक्रम करत आपलं लेखन गावोगावी तर पोहोचवलंच, पण त्यांच्या कथाकथनाच्या ऑडियो कॅसेट्समुळे ते अक्षरशः घराघरात जाऊन पोहचले होते. त्यांच्या कथांवर एकांकिका, नाटकं आणि सिनेमे निघाले होते. वपु स्वतःही उत्तम अभिनेते होते.

वपु याचं लेखन हे मराठी मध्यमवर्गीय, पांढरपेशी भावविश्वाभोवती फिरत असलं तरी त्यांची तत्त्वज्ञानप्रचुर, हलकीफुलकी, सोप्पी सुभाषितवजा वाक्यं समाजातल्या सर्वच स्तरातल्या लोकांवर विलक्षण मोहिनी टाकणारी असत. अशा या प्रतिभावंत लेखकाचे २६ जून २००१ रोजी निधन झाले. आजही त्यांची पुस्तके आवर्जून वाचली जातात. त्यांच्या बहुसंख्य पुस्तकांमधल्या चमकदार आणि सुभाषितवजा वाक्यांचा संग्रह 'वपुर्झा' या नावाने प्रसिद्ध आहे. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# दृष्टी सुधारण्यासाठी 'या' गोष्टी नियमित करा

चष्मा लागणं ही आता खूपच सामान्य बाब झाली आहे. चाळिशी जवळ आली तरी चष्मा लागलेला नाही, अशा व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. आपल्या आहारातून पुरेसं पोषण मिळत नाही, शिवाय कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या स्क्रिनचा वापर खूप जास्त वाढला आहे. आकाशाकडे, हिरवळीकडे नजर लावून पाहाणं, खूप दूरवर नजर लावून पाहाणं हे सगळंच आता कमी झालेलं आहे. त्याचा परिणाम डोळ्यांच्या आरोग्यावर होतोच. त्यामुळेच हल्ली चष्मेबहाद्दुरांचं प्रमाण वाढलं आहे. काही लोक खूप स्टायलिश पद्धतीने चष्मा कॅरी करतात. पण काही लोकांना मात्र तो मुळीच आवडत नाही. तुम्हालाही चष्मा लावणं आवडत नसेल किंवा नजर तेज करायची असेल तर या काही गोष्टी काही दिवस नियमितपणे करून पाहा.



डोळ्यांची दृष्टी नैसर्गिकपणे वाढवून चष्म्याचा नंबर कमी करण्यासाठी काय करावं, याविषयी माहिती सांगणारा व्हिडिओ योग अभ्यासकांनी officialcanwinn या इंस्टाग्राम पेजवर शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी साधे सोपे चार उपाय सुचवले आहेत.

पहिला उपाय म्हणजे सगळ्यात आधी तर दोन्ही तळहात एकमेकांवर घासा आणि नंतर ते दोन्ही तळवे डोळ्यांना लावा. तळहातांमध्ये तयार झालेली उष्णता डोळ्यांसाठी खूप फायदेशीर ठरते.

यानंतर बोटाच्या टोकाला थोडी लाळ लावावी आणि ती काजळ लावल्याप्रमाणे आपल्या डोळ्यांना लावावी. आपले अनेक विकार कमी करण्यासाठी लाळ उपयुक्त ठरते. त्यामुळेच तर सकाळी उठल्यानंतर तोंड न धुता पाणी प्यावं, असं सल्ला काही योगतज्ज्ञ नेहमीच देतात.

त्यानंतर हाताच्या पहिल्या तीन बोटांपैकी एक बोट एका डोळ्याच्या नाकजवळ असणाऱ्या कोपऱ्यावर, दुसरे बोट कपाळावर दोन्ही भुवयांच्या मधे आणि तिसरे बोट दुसऱ्या डोळ्याच्या नाकाजवळ असणाऱ्या कोपऱ्यावर ठेवा आणि तिथल्यातिथेच ५ वेळा बोट क्लॉकवाईज आणि एंटीक्लॉकवाईज या पद्धतीने गोलाकार फिरवा.

यानंतर बोटाच्या टोकांनी डोळ्यांच्या आसपासचा भाग, कपाळ याठिकाणी १५ ते २० सेकंदासाठी टॅपिंग करा. यानंतर पुन्हा दोन्ही तळहात एकमेकांवर घासून हातांची उष्णता डोळ्यांना द्या. काही महिने नियमितपणे हा उपाय केल्यास चष्म्याचा नंबर कमी होईल, असं व्हिडिओमध्ये सांगितलं आहे.

# पावसाळी पर्यटनात काळजी अनिवार्य

**◆ माथेरानमधील स्थानिक प्रशासनाचा इशारा**
**◆ नियमांचे पालन करण्याचे आवाहन**



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या शारलोट तलावात बुडून तीन पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. यानंतर स्थानिक प्रशासन सतर्क झाले असून शारलोट तलाव ओव्हरफ्लो धबधबा पर्यटकांसाठी बंद करण्यात आला आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चेतावणी फलक आणि तारचे कुंपण लावण्यात आले आहे.

माथेरान पर्यटनस्थळी पावसाला सुरवात झाल्यापासून शनिवार आणि रविवार बरोबरच मधल्या दिवसांतदेखील पर्यटकांची संख्या वाढत असून येथे एक दिवसीय पर्यटनासाठी पर्यटक दररोज हजारोंच्या संख्येने येत असतात. येथील निसर्गरम्य पॉईंट, धबधबे आणि शारलोट तलाव या भागात पर्यटक मोठी गर्दी करीत असतात.गर्दीच्या ठिकाणी हुल्लडबाजी करणे

आणि बेजबाबदार पणे वागणूक करणे यासर्व बाबी टाळण्यासाठी प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे. माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेकडून शारलोट तलाव ओव्हरफ्लो धबधबा ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तारेचे कुंपण करून चेतावणी फलक लावण्यात आला आहे. तसेच येथील धोकादायक ठिकाणी फोटो, सेल्फी घेणे टाळावे तसेच मद्यपान आणि मादक पदार्थांचे सेवन टाळावे, असे आवाहन पर्यटकांना करण्यात आले आहे. मागील रविवार १५ जून रोजी शारलोट तलावाच्या पाण्यामध्ये पोहण्यासाठी सक्त मनाई असताना काही पर्यटक येथे पाण्यात उतरले पाण्याचा खोलाचा अंदाज नसल्याने या तलावात तीन युवकांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने सतर्कतेच्या दृष्टीने पर्यटकांसाठी मार्गदर्शक सूचना करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती या वेळी माथेरान गिरीस्थान नगरपरिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांनी रामप्रहरशी बोलताना दिली. तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला सुद्धा पावसाळी चार महिने शारलोट तलाव परिसरात सुरक्षा रक्षक नेमण्याच्या सूचना केल्या आहेत, असेदेखील त्यांनी यावेळी सांगितले, मात्र शारलोट तलाव धबधबा पर्यटकांसाठी बंद केल्याने याठिकाणी येणाऱ्या पर्यटकांचा हिरमोड होत असल्याचे स्थानिक दुकानदार व्यावसायिकांकडून बोलले जात आहे.

> **पावसाळी चार महिने येथील पर्यटन हंगाम जोरदार असतो शारलोट तलाव येथील सुरक्षित धबधब्यावर पर्यटक मोठ्या संख्येने येतात, मात्र आता पर्यटकांना धबधब्याजवळ जाण्यास बंदी घातली असल्याने याठिकाणी पर्यटक येण्याचे प्रमाण कमी होईल आणि याचा परिणाम आमच्या व्यवसायावर होईल.**
> **–मंगेश शिंदे, दुकानदार**

# खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत चौक येथे नवीन इमारत



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस यांनी लोक सहभागातून चौक येथे नवीन इमारत उभी केली असून तिचा लोकार्पण सोहळा रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आला.

पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी उप निरीक्षक विशाल पवार, पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे यांनी लोक सहभागातून खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत चौक येथे नवीन दूर क्षेत्र इमारत बांधली आहे.

खालापूर तालुक्यातील चौकमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, आलेल्या प्रत्यक माणसाला या इमारतीचा उपयोग होईल, असे उप विभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी सांगितले. अंदाजे वीस लाख रुपये या इमारतीला खर्च आला आहे.

या वेळी खालापूर पोलीस यांच्या वतीने, पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या हस्ते शालेय विद्यार्थी यांना शैक्षणिक साहित्य वाटप, पोलीस बांधव यांना रेनकोट वाटप, हेल्प फाऊंडेशन यांना साहित्य वाटप, पोलीस यांना वाहतुकीसाठी बॅरेकेट वाटप करण्यात आले. सरपंच रितू ठोंबरे यांनी ही मनोगत व्यक्त केले. पोलीस उप निरीक्षक विशाल पवार व पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे यांचा सन्मान पोलीस अधिक्षक आँचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी चौक सरपंच रितू ठोंबरे, भाजप नेते विनोद भोईर, मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी सरपंच प्रफुल्ल विचारे, ॲड. प्रभाकर सावंत, पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे, हेल्फ फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर व त्यांची टीम, उद्योजक यासीन भालदार, कंपनीचे प्रतिनिधी यांच्यासह चौक परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

# म्हाबदे घाटामध्ये कचरा

## वनविभागाने चौकशी करण्याची मागणी



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन-दिघी मार्गावरत म्हाबदे घाटामध्ये दिघी च्या बाजूकडे जाताना सपाट असलेल्या रस्त्यावरती डाव्या बाजूला मोठा दुर्गंधीयुक्त कचऱ्याचा ढीग लावण्यात आलेला आहे.

म्हाबदे घाट हा अत्यंत निसर्ग रम्य असा परिसर आहे. या ठिकाणी विविध प्रकारचे पक्षी, त्याचप्रमाणे प्राणी यांचा नियमित वावर असतो. सदर घाटामधून बिबट्याचादेखील संचार असल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे. अशा निसर्गरम्य ठिकाणी कोणीतरी व्यक्तीने दुर्गंधीयुक्त कचरा आणून टाकल्याचे निदर्शनास आले आहे. हा संपूर्ण परिसर वन विभागाच्या अखत्यारित येतो. तरी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर कचरा त्या ठिकाणी कोणत्या व्यक्तीने आणून टाकला? याबाबत चौकशी करून त्या व्यक्तीवर योग्य प्रकारे कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निसर्गप्रेमी नागरिकांमधून केली जात आहे.

# भाजप नेत्या चित्रा वाघ यांचे पेणमध्ये स्वागत



**पेण : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र राज्य महिला मोर्चा अध्यक्षा चित्रा वाघ यांचे मुंबई-गोवा महामार्गावरील हॉटेल साई सहारा येथे भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील आणि रायगड जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्षा शर्मिला पाटील यांनी शेकडो महिला कार्यकर्त्यांसह स्वागत करून सदिच्छा भेट घेतली.

चित्रा वाघ २५ जून रोजी नागोठणे येथे आयोजित करण्यात आलेल्या संकल्प से सिद्धी अंतर्गत महिला मेळाव्यासाठी मार्गस्थ होत्या. या मेळाव्यात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ११ वर्षांत केलेले कार्य, विशेषतः महिला सक्षमीकरणासाठी राबवलेल्या विविध योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहचवण्यासाठी त्या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर नागोठणेच्या दिशेने जात असताना त्यांनी मुंबई-गोवा महामार्गाजवळील हॉटेल साई सहारा येथे थांबून कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या वेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, भाजप रायगड जिल्हा महिला मोर्चा उपाध्यक्षा शर्मिला पाटील, भाजप पेण तालुकाअध्यक्ष संजय डंगर, जगदीश पाटील, संजय घरत, निशाकर घरत, नरेश महाराज आदींसह शेकडो महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. चित्राताईंनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत महिलांच्या सहभागाबद्दल कौतुक केले.

या सदिच्छा भेटीद्वारे महिला मोर्चातील कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळाल्याचे वातावरण होते.


**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीने कळविण्यात येते की :

गाव-आडीवली,तालुका- पनवेल, जिल्हा - रायगड, येथील गट क्रमांक ४२/अ/१०/२, क्षेत्र १.३०.८० हे.आर आकार रु. १४.०० येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत श्री. जनार्दन पांडुरंग पाटील यांच्या मालकीची आहे.

दि. २३/०७/२०२२ रोजी श्री. जनार्दन पांडुरंग पाटील व माझे अशील मे. स्कारलेट ग्रीनहील्स प्रा.लि. यांच्यादरम्यान वरील जमिनीचा विकसन करार (Development Agreement) करण्यात आलेला आहे. सदर करारानुसार, माझे अशीलांनी श्री. जनार्दन पांडुरंग पाटील यांना करारात ठरल्याप्रमाणे लक्षणीय रक्कम अदा केलेली आहे. माझे अशील करारात ठरल्याप्रमाणे रक्कम अदा करण्यास व कराराची पूर्तता करण्यास सदैव तयार असताना, श्री. जनार्दन पांडुरंग पाटील यांनी कोणतीही वैध कारणे न देता व कराराच्या अटींचा भंग करून, एकतर्फी व बेकायदेशीर दिनांक १८/०६/२०२५ रोजीची विकसन करार रद्द करण्याची नोटीस माझे अशीलांस पाठवली आहे. सदर नोटिसीतील मजकूर खोटा, खोडसाळ व बनावट असून तो माझे अशिलास मान्य नाही. दि. २३/०७/२०२२ रोजीचा श्री. जनार्दन पांडुरंग पाटील व माझे अशील मे. स्कारलेट ग्रीनहील्स प्रा.लि. यांच्यादरम्यान झालेला वरील जमिनीचा विकसन करार आजरोजी सुद्धा अमलात आहे व उभय पक्षकारांवर बंधनकारक आहे. माझे अशील त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याच्या प्रक्रियेत आहेत.

सबब, सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीने, संस्था, कंपनीने किंवा विकासकाने कोणताही खरेदी-विक्री व्यवहार, करार, करारनामा, बंधपत्र, विकास करार इत्यादी करु नये. अशा प्रकारचा कोणताही व्यवहार केल्यास, सदर व्यवहार माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित व्यक्तीची स्वतःची राहील याची नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दिनांक:- २५/०६/२०२५**

**सही/-**
**जेके असोसिएट्स,**
**ॲड. चेतन जाधव,**
**पुष्कर सीएचएस, फ्लॅट नं. ०२, प्रांत कार्यालयाजवळ,जुना ठाणे नाका रोड,**
**पनवेल, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.**


# रायगड जिल्ह्यात २४ जून ते ८ जुलैदरम्यान जमावबंदी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या शिफारशीनुसार आणि अपर जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशानुसार २४ जून २०२५ रोजी ००:०१ वाजल्यापासून ते ०८ जुलै २०२५ रोजी रात्री २४:०० वाजेपर्यंत जमावबंदी लागू करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर, खोपोली, रसायनी, रोहा, माणगाव, महाड, नागोठणे, अलिबाग या औद्योगिक भागांमध्ये कामगार संघटनांकडून आंदोलन व संप पुकारले जात असल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय धार्मिक व जातीय तणावाचे प्रसंग, तसेच २७ जून ते ६ जुलै २०२५ पर्यंत मुस्लिम बांधवांचा मोहरम हा सण साजरा करण्यात येणार आहे. सदरवेळी मोहरम निमित्त पाच ठिकाणी नमाज पठण करण्यात येणार असून ७२ ठिकाणी मिरवणूका काढण्यात येणार आहेत.

तसेच ६ जुलै २०२५ रोजी हिंदू बांधवांचा आषाढी एकादशी हा सण साजरा होणार आहे. वरील सर्व परिस्थिती पाहता अस्थिरता उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन ही अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

जमावबंदीदरम्यान खालील गोष्टींवर बंदी असेल :शस्त्र, लाठ्या, सुरे, तलवारी इ. वस्तू बाळगणे,स्फोटक किंवा ज्वलनशील पदार्थ घेऊन फिरणे, दगडफेक किंवा क्षेपणास्त्रे बाळगणे व तयार करणे, प्रतिमा किंवा आकृत्यांचे सार्वजनिक प्रदर्शन करणे, आक्षेपार्ह घोषणा, गाणी किंवा वाद्य वाजविणे, धोकादायक भाषण, हावभाव, चित्रप्रदर्शन पाच किंवा अधिक व्यक्तींचा जमाव परवानगी शिवाय जमविणे.

सूट कोणाला? या अधिसूचनेतून शासकीय अधिकारी, शासकीय कर्तव्यावरील कर्मचारी, तसेच शवयात्रा व अंत्यविधीसाठी जमणारा जमाव, आणि तहसीलदारांच्या परवानगीने आयोजित कार्यक्रम वगळण्यात आले आहेत. तहसीलदार किंवा कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी परवानगी दिल्यासच कोणताही उत्सव, सभा, मिरवणूक आयोजित करता येणार असून त्याची जबाबदारी आयोजकांची असेल. पोलीस व जिल्हा प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

# काजूवाडी येथील अंगणवाडीतील चिमकल्यांच्या हस्ते वृक्षारोपण

**खोपोली : प्रतिनिधी**

गर्भवती आणि स्तंधमाता यांच्या हस्ते वृक्षारोपण करीत झाडे जगवा असे शासनाच्या वतीने सांगण्यात आल्याने एकात्मिक बाल विकास सेवा योजना नागरी प्रकल्पाच्या काजुवाडीतील अंगणवाडी क्रमांक ११ मधील चिमुकले आणि सामाजिक कार्यकर्त्या यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या बाजूला वृक्षारोपण करण्यात आले आहे.

या वेळी सामाजिक कार्यकर्त्या चंदा पाटील, सुनिता वाघमारे, सामाजिक कार्यकर्ते निलेश पाटील, अंगणवाडी सेविका सुजाता यादव, संगिता महाडीक यांच्यासह अंगणवाडीतील चिमुकले आणि माता उपस्थित होत्या.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी गर्भवती आणि स्तंधमाता यांच्याहस्ते वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचे शासनाच्या माध्यमातून वेळोवेळी सांगण्यात आल्याने एकात्मिक बाल विकास सेवा योजना नागरी प्रकल्पाच्या काजुवाडीतील अंगणवाडी क्रमांक ११ मधील चिमुकले आणि सामाजिक कार्यकर्त्या यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या बाजूला वृक्षारोपण केले असून त्यांचे संवर्धन करणार असल्याचे अंगणवाडी सेविका सुजाता यादव यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.




**रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग,कामोठे**

**प्लॉट नं. ४१,सेक्टर-११, कामोठे-नवी मुंबई**

रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागामधील; रायगड, मुंबई, ठाणे व पालघर जिल्ह्यातील वास्तुविशारदांची नामनिर्देशन सूची तयार करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्तींचे विहित नमुन्यात देकार (Expression of Interest)मागविण्यात येत आहेत.


सदर देकाराची सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठे, पनवेल या कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. २६/०६/२०२५ ते दि. १०/०७/२०२५ या कालावधीत उपलब्ध होतील. भरलेले अर्ज दि. १६/०७/२०२५ पर्यंत वरील कार्यालयात स्वीकारले जातील.

**अधिक महितीसाठी :- विनय म्हात्रे**
**संपर्क :-** 9619285963

**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा**




**अलिबाग : जागतिक योग दिनानिमित्त अलिबाग सार्वजनिक वाचनालयातर्फे (डोंगरे हॉल) योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, सार्वजनिक वाचनालय अलिबागचे संचालक नागेश कुलकर्णी ग्रंथपाल रजिता माळवी, सहाय्यक ग्रंथपाल अमित धुमाळ, लेखनिक अपूर्व वर्तक, शिपाई अंकित म्हात्रे, अभिषेक भगत, अर्चना माळवी तसेच सभासद निकेश गावंड, तंबी, राजेश पाटील, मंदार कुलकर्णी आदी उपस्थित होते.**



**माणगाव : एस.एस. निकम इंग्लिश स्कूल, इंदापूर येथे आंतरराष्ट्रीय योगा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील पूर्व प्राथमिक ते इयत्ता दहावीपर्यंतचे विद्यार्थी, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारीवर्गाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सहाय्यक शिक्षक विकास गुगले यांनी योगाचा शालेय जीवनातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले.**

# रानभाज्या आरोग्यासाठी लाभदायक -डॉ. राकेश कवळे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रानभाज्या आरोग्यासाठी लाभदायक असतात. त्याचे योग्य प्रमाणात सेवन केले पाहिजे, असे प्रतिपादन आरसीएफ थळचे वरीष्ठ जनसंपर्क अधिकारी डॉ. राकेश कवळे यांनी केले.

वनवासी कल्याण आश्रम, कोकण प्रांत, कुलाबा जिल्हा आणि जे. एस. एम कॉलेज अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉच्या मुट कोर्ट हॉलमध्ये मंगळवारी या राजमानी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या रानभाजी महोत्सव उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राकेश कवळे बोलत होते. आर. सी. एफ. थळचे मानव संसाधन प्रशासन उप महाव्यवस्थापक प्रशांत पाटील, जे.एस.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, आर.सी. एफ. थळचे जनसंपर्क अधिकारी योगेंद्र भोईर आदी या वेळी उपस्थित होते.

जिल्हा शिक्षण आयाम प्रमुख ॲड. नीला तुळपुळे यांनी रान भाज्या कशा कराव्यात आणि त्यांचे औषधी गुणधर्म यांची माहिती दिली. लतिका दातार यांनी प्रस्ताविक केले.




**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**शहर अभियंता विभाग**
**ई- निविदा सुचना**

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

| अनु.क्र | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/ ४३/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील नवीन पनवेल (पश्चिम) येथील सेक्टर-१८, भुखंड क्र.८अ + ८ब येथे माता व बालसंगोपन केंद्र उभारणे. | १५४,१६,२३,८९४/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि.३०/०६/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र. २८४/२८७/२०२५
दिनांक :- २५/०६/२०२५

**सही/-**
**( गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त- I**
**पनवेल महानगरपालिका**

# नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव मिळणार -डॉ. संजीव नाईक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकार देशातील पाच विमानतळाच्या नामकरणाबाबत लवकरच निर्णय घेणार आहे. त्यात राज्य सरकारने एकमताने मंजूर करून केंद्र सरकार कडे पाठविलेला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्तावदेखील आहे, त्यामुळे विमानतळाचे दि. बा पाटील असेच नामकरण होईल याबाबत मनांत कोणतीही शंका नाही, असे माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांनी सांगितले.

प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व: दि. बा. पाटील यांच्या १२ व्या स्मृतिदिना निमित्ताने नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेच्या वतीने वाशी येथील सिडको ऑडिटोरियम येथे आयोजित करण्यात आलेल्या इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थी गुणगौरव आणि ज्येष्ठ नागरिकांना छत्री भेट या सामाजिक कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून संजीव नाईक उपस्थित होते.

या वेळी नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेविका फशीबाई करसन भगत, वैजयंती दशरथ भगत, युवा नेतृत्व निशांत भगत, समाजसेवक संदीप भगत, संजय यादव, देवेंद्र खाडे, विठ्ठलराव यादव, शैलेश




घाग, सचिन शिंदे, मनोज महाराणा, बृहन्मुंबई व मुंबई तसेच उरण विभागातील मच्छिमार बांधवांचे नेतृत्व करणारे भुवनेश्वं धनु, विजय वरळीकर, चंद्रकांत कोळी, राकेश कोळी, प्रमोद कोळी, जयेश आक्रे, अजिंक्य पाटील, संदेश भोटेकर हेदेखील उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळात १४ हजार तरुणांना रोजगार मिळणार आहेत. त्यापैकी तीन हजार तरुणांची भरती प्रक्रिया पूर्ण होऊन त्यांना प्रशिक्षण देखील दिले जात आहे. तसेच भविष्यात ५५ हजारापेशा जास्त रोजगार निर्माण होणार आहे. त्यासाठी नवी मुंबईतील वेगवेगळ्या ७ महाविद्यालयांमध्ये एआयचे शिक्षण सुरू करण्यात आले. तसेच इम्पोर्ट एक्स्पोर्ट (आयात निर्यात) क्षेत्रात देखील मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होणार आहेत. सीबीडी येथे लॉजिस्टिक क्षेत्र कार्यरत व्हायला सुरुवात झाली आहे, नवी मुंबईत विविध इंटरनॅशनल व नॅशनल कपन्यांकडून सुमारे ५५० लाख कोटी रुपयांची डेटा सेंटर मध्ये गुंतवणूक केली जाणार असल्याने डेटा सेंटर्स मध्ये देखिल नोकरी उपलब्ध होणार आहेत, त्यादृष्टीने तरुणांनी शिक्षण घेतले पाहिजे असे सांगत शहरातील धोकादायक इमारतीचे सेल्फ पुनर्विकास करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे डॉ संजीव नाईक यांनी सांगितले.

दि. बा. पाटील साहेब यांचे सर्व आयुष्य हे लोकांसाठी आणि समाजासाठी समर्पित होते. त्यांनी प्रकल्पग्रस्तांसाठी जमीन परतावा कायद्याच्या माध्यमातून साडेबारा टक्के योजनेतून भूखंड प्रकल्पग्रस्तांना मिळाले आहेत. प्रकल्पग्रस्त आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करतात, मात्र शहरातील नागरिकांसाठी देखील त्यांच्या शहरातील नव्याने निर्माण झालेल्या गरजांसाठी आंदोलन करणे आवश्यक आहे, त्यासाठी सिडकोची सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे आणि पंतप्रधान आवास योजना या योजनेतील पन्नास टक्के घरे ही स्थानिकांसाठी राखीव ठेवली पाहिजे असे नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष दशरथ भगत यांनी सांगितले.

एकविसाव्या शतकात दि. बा पाटील यांच्या सारखे आयुष्य कोणी जगू शकत नाही. विद्यार्थीचा गुणगौरव आणि ज्येष्ठांना छत्र्या भेट हा समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात आला असल्याचे युवा नेते निशांत भगत यांनी सांगितले. प्रभागातील नागरिकांची सुरक्षा स्वच्छता, शांतता ठेवणे यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. प्रभागातील नागरिक हे आपला परिवार आहेत म्हणून प्रभागात यापुढेही प्रभागातील नागरिकांच्या जीवनातील, वैयक्तिक अडचणी सोडविण्यासाठी आपण वचनबद्ध आहोत असे निशांत भगत म्हणाले.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, महाविद्यालयीन बॅग्स भेट देऊन गुणगौरव करण्यात आला तसेच ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यादेखील भेट देण्यात आल्या.

## 'दिबां'ना अभिवादन; उपोषण स्थगित

■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील येऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत केंद्र सरकारने उद्घाटनापूर्वी अधिसूचना काढण्याच्या मागणीसाठी कामगार नेते आणि जेएनपीटीचे माजी विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील यांनी २४ जून २०२५ रोजी जासई येथील हुतात्मा स्मारकाजवळ सुरू केलेले आमरण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सरबत पिऊन स्थगित केले.

प्रकल्पग्रस्तांचे झुंझार लोकनेते दि.बा.पाटील यांचा १२वा स्मृतिदिन मंगळवारी होता. याचदिवशी कॉम्रेड भूषण पाटील यांनी उपोषणाला सुरुवात केली होती. तसेच दुपारच्यादरम्यान उपोषणस्थळी जाहीर श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या सभेला विमानतळ नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, वाय. टी. देशमुख, दि.बा.पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, दीपक म्हात्रे, जे. डी. तांडेल, कामगार नेते सुरेश पाटील, जितेंद्र म्हात्रे, सीमा घरत, नंदराज मुंगाजी, सुधाकर पाटील, नीलेश पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

या वेळी दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील यांनी नामकरणाबाबतची सद्यस्थिती स्पष्ट केली आणि विमानतळाच्या उद्घाटनाच्या दिवशीच नामकरण होईल, असा विश्वास व्यक्त केला. नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील आणि माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनीही अतुल पाटील यांच्या भूमिकेला दुजोरा दिला. उपस्थित सर्व मान्यवरांनी केलेल्या विनंतीनुसार, कॉम्रेड भूषण पाटील यांनी आपले उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.






**पनवेल : वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वे सुरक्षा समितीची बैठक झाली. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, पोलीस हवालदार रासकर, घाटकरी, नगरे, कासार, सपना पाटील, कविता पाटील, कविता ठाकूर व पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार उपस्थित होत्या.**



**पुणे : आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या हजारो वारकरी बांधवांसाठी ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने एक स्तुत्य उपक्रम राबवून जेजुरी येथे वारकरी बांधवांना बिस्किट आणि पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले. वारकऱ्यांच्या सेवेसाठी टीआयपीएल कंपनीने पुढाकार घेत या सेवाभावीकार्याचे आयोजन केले होते. या वेळी स्वप्नील ठाकूर, अजय पाटील यांच्यासह कंपनीचे इतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी स्वतः वारकऱ्यांशी संवाद साधत त्यांना बिस्किटे आणि पाण्याचे वाटप केले. टीआयपीएलच्या या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

## पारसिक हिलवरील मेटल बीम क्रॅश बॅरियर तुटले



**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विभाग कार्यालयांतर्गत येणाऱ्या पारसिक डोंगर परिसरातील रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेल्या मेटल बीम क्रॅश बरियर तुटलेले आहेत. यातील काही बरीयर विरूनदेखील नेल्याचे दिसून येत आहे. हे सुरक्षा कठडे नव्याने लावावेत अथवा त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी भाजपचे सुधीर पाटील यांनी पालिकेकडे केली आहे.

पारसिक हिल डोंगरावर वळणावळणाचे रस्ते आहेत. निमुळते रस्ते असल्याने अनेक वाहनांचा अपघात होण्याची शक्यता असते. ही बाब लक्षात घेत पालिकेने या ठिकाणी लोखंडी सुरक्षा कठडे रस्त्याच्या कडेला लावले होते, मात्र लोखंडी कठडे जीर्ण अवस्थेत आले असून, अनेक ठिकाणी भाग तुटलेले आहेत. तर काही ठिकाणी कठडे चोरून नेले असावेत असा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे वाहनांचे अपघात होऊ शकतात.

पावसाळ्यामध्ये डोंगरभागातून येणारे पावसाचे पाणी चरांची मिर्मिती न केल्यामुळे रस्त्यातून वाहत असते. त्यामुळे सततच्या पावसाच्या पाण्यामुळे रस्त्यावर खड्डे पडतात. त्यामुळे अपघाताची शक्यता वाढते. यासाठी नवी मुंबई महानगर पालिकेने या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी रस्त्याच्याकडेला चरांची निर्मिती करावी. या नैसर्गिक पाणी साठवून ते टेकडीवरील झाडांना त्याचा फायदा होऊ शकतो. पावसाळा व्यतिरिक्त या टेकडीवर लावलेली झाडे पाण्याअभावी सुकून जातात. त्यामुळे रेन हार्वेस्टिंग सिस्टिम बनविल्यास फायदा होऊ शकेल.



## जासई विद्यालयात 'दिबां'ना अभिवादन

**उरण : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनियर कॉलेजमध्ये लोकनेते दि.बा.पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

सकाळी विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या दि. बा.पाटील साहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष आणि भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील व कामगार नेते भूषण पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पन करून विद्यालयाच्या प्राचार्या के.जी. म्हात्रे व इतर सर्व मान्यवरांच्या हस्ते दि.बा. पाटील साहेबांच्या पालखीचे पूजन केले गेले. विद्यालयाच्या प्रांगणात विद्यालयातील विद्यार्थिनी सान्वी घरत हिने आपल्या धडाकेबाज शैलीत दि.बा. पाटील साहेबांचे जीवन चरित्र व त्यांचा लढा आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना ऐकविला. त्यानंतर फुलांनी सजविलेल्या पालखीत दि.बा.पाटील साहेबांची प्रतिमा ठेवून पालखी जासई विद्यालयातून संपूर्ण गावात फिरविण्यात आली. दि.बा.पाटीलसाहेबांच्या नावाचा विद्यार्थ्यांनी जयघोष केला. गावातील सुवासिनी, नागरिक, आबाळवृद्ध यांनी दि.बा. पाटील साहेबांचे आशीर्वाद घेतले. शेवटी पालखी संपूर्ण गावातून फिरून विद्यालयात परतली.

या पालखी सोहळ्यासाठी जासई गावातील महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठान मार्फत सर्व विद्यार्थ्यांना व उपस्थित नागरिकांना नाश्त्याची व्यवस्था केली गेली होती. या भक्तिमय कार्यक्रमासाठी विद्यालयाचे व्हा.चेअरमन डी.आर.ठाकूर स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य नरेश घरत, गणेश पाटील, मधुकर पाटील, नुरा शेख, रघुनाथ ठाकूर, यशवंत घरत, सल्लागार समितीचे मान्यवर सदस्य ग्रामस्थ सर्व विद्यार्थी व सेवक उपस्थित होते. हा कार्यक्रम जासई हायस्कूल व महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने झाला.

## पुनाडे येथे नेत्रचिकित्सा शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील पुनाडे गावाचे सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र आत्माराम पाटील आणि डोळ्यांचे डॉ. दिक्षा अनिकेत डाकी, अनिकेत कृष्णा डाकी, आणि प्रसिद्ध जागतिक नेत्रतज्ञ डॉ.सुहास हळदिपुरकर ह्यांच्या लक्ष्मी चेरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पुनाडे गावातील तसेच पंचक्रोशीतील गरजु आणि गरीब लोकांसाठी पुनाडे गावातील हनुमान मंदिर येथे नेत्र चिकित्सा शिबीराचे अल्प दरात आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना शिंदे गटाचे रमेश म्हात्रे (संपर्क प्रमुख उरण विधानसभा), नेत्र चिकित्सा तज्ञ डॉ.श्रध्दा मामीदवार, डॉ.दिक्षा अनिकेत डाकी, शिबिराचे संयोजक विनोद पाचगेर,उपोषण सम्राट अजित म्हात्रे, काशीबाई खारपाटील (चिरनेर), जयप्रकाश यादव, ॲड. रुषाली पाटील, कृष्णा डाकी, सुरेंद्र पाटील, रंजित ठाकूर, हरिश्चंद्र पाटील (केळवणे), देविदास पाटील (पुनाडे), स्वागत म्हात्रे, जिवन पाटील (सारडे),लिलाबाई पाटील आदि मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

पुनाडे गावातील सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र आत्माराम पाटील हे सामाजिक बांधिलकी जपत ते नेहमी पुनाडे गावासाठी सातत्याने सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवित असतात. पुनाडे गावातील गोरगरीब जनतेसाठी देवेंद्र पाटील यांनी जनु काही मदतीचा सपाटाच लावला आहे. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून डॉ. दिक्षा अनिकेत डाकी हिने पुनाडे गावातील लोकांसाठी नेत्र चिकित्सा शिबीराचे आयोजन केले आहे.

सामाजिक कार्यकर्ते देवेंद्र पाटील आणि डॉ.दिक्षा डाकी यांनी राबवित असलेल्या विविध उपक्रमांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

क्लिक...क्लिक...!



**अलिबाग : तालुक्यातील अलिबाग-वडखळ महामार्गावरील तीनवीरा धरण ओव्हरफ्लो झाले आहे. मुसळधार पावसामुळे डोंगरातून वेगाने येणारे पाणी धरणाच्या काठावरून ओसंडून वाहत आहे.** (छाया : जितू शिगवण)

## घणसोलीत अनधिकृत बांधकामावर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात अतिक्रमण विभागाने घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

अनधिकृत बांधकामांस घणसोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती, परंतू त्यांनी सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

## सोनारीतील ज्येष्ठ नागरिकांसाठी सहल

**उरण : प्रतिनिधी**

वृध्दापकाळात येणारी नैराश्याची भावना, घरच्यांकडून होणारे दुर्लक्ष यामुळे मनोरंजन, विरंगुळ्यापासुन दूर राहाणाऱ्या जेष्ठ नागरिकांसाठी उरण तालुक्यातील सोनारी येथील ज्येष्ठ नागरिक संघाने जेष्ठ नागरिकांसाठी दोन दिवसांच्या मोफत सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. वृध्दापकाळात मानसिक, शारीरिक व्याधी जडतात. त्यामुळे मानसिक स्वास्थ्यही बिघडते. त्याकडे घरच्यांकडूनही नकळत का होईना कानाडोळा केला जातो.

यामुळे वृद्धांच्या मनात नैराश्याची भावना घर करून राहाते. वृध्दाची नैराश्याची भावना दूर करून त्यांना मनोरंजन, विरंगुळा मिळावा, निरोगी आयुष्य लाभावे या उद्देशाने सोनारी येथील ज्येष्ठ नागरिक संघाने २५ व २६ जुन अशा दोन दिवसांच्या मोफत सहलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या दोन दिवसात जीवनदानी आणि वज्रेश्वरी या दोन धार्मिक, पर्यटन स्थळांचे ज्येष्ठ नागरिकांना दर्शन घडविले जाणार आहे. या आयोजित सहलीत सोनारीतील १२५ ज्येष्ठ नागरिक सहभागी होणार आहेत.

सोनारीतील ज्येष्ठ नागरिक संघाचे संस्थापक दिनेश कडू, अध्यक्ष नारायण कडू, उपाध्यक्ष रोहिदास पाटील, सेक्रेटरी रामदास म्हात्रे, सहसेक्रेटरी नरेश कडू, अशोक कडू, के. के. कडू, केशव तांडेल, हरिश्चंद्र कडू यांच्या प्रयत्नातून आणि उद्योजक शंकर तांडेल यांच्या सहकार्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत सहलीचे आयोजन करण्यात आले आहे.

याआधीही संघटनेच्या वतीने ज्येष्ठांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले असल्याची माहिती संस्थापक दिनेश कडू यांनी दिली आहे.

## लव्हेज येथील डम्पिंग ग्राउंडला
# ग्रामस्थांचा तीव्र विरोध

**खोपोली : प्रतिनिधी**

नगररचना विभागाने विविध विकासकामांसाठी नगर परिषद हद्दीतील जागा आरक्षित केली आहे यातील खोपोली प्रभाग क्रमांक १मधील लव्हेज गावाच्या हद्दीत डम्पिंग ग्राउंडसाठी जागा आरक्षित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यास ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला असून हे आरक्षण रद्द करावे; अन्यथा ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे, असा इशारा नगर परिषद कार्यालयात सुनावणीदरम्यान ग्रामस्थांनी दिला. या डम्पिंग ग्राउंडमुळे लव्हेज, श्रीराम नगर, उदय विहार, सरस्वती नगर, चिंचवली (शेकीन) इत्यादी ग्रामस्थांना याची झळ पोहचणार आहे. येथील ग्रामस्थांचा आरोग्याच्या प्रश्न भविष्यात उद्भवणार आहे.

खोपोली नगर परिषद कार्यालयातील पाचव्या मजल्यावरील सभागृहात मंगळवारी (दि.२४) शहराच्या विविध भागातील नागरिकांच्या आरक्षणाबद्दल सुनावणी आयोजित करण्यात आली होती. यात लव्हेज ग्रामस्थांनी कुठल्याही परिस्थितीत डम्पिंग ग्राउंड होऊन देणार नाही, असा ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा दिला. निलेश थरकुडे, संजय पाटील, निशा थरकुडे, ज्योती पाटील, स्वाती साळुंखे, रवी रोकडे, अरुण पाटील, निखिल थरकुडे, महेश पाटील, जयेश मोरे, सुदेश थरकुडे, इत्यादी ग्रामस्थांनी आपले म्हणणे मांडताना डम्पिंग ग्राउंडला तीव्र विरोध दर्शविला. या गावाच्या परिसरात दोन शाळा आहेत, मंदिरे आहे तसेच वन विभागाचा हिरवागार पट्टा आहे; त्याचप्रमाणे खोपोलीनंतर या भागाला महत्त्व आल्याने मोठ्या प्रमाणात



रहिवासी राहण्यासाठी येत आहेत. लव्हेज भागात मोठ्या प्रमाणात सह्याद्रीच्या रांगा आहेत. इथून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचे लोट गावाच्या दिशेने येत असतात. अनेकदा ग्रामस्थांच्या घरात पाणी येते व त्यामुळे ग्रामस्थांना मान्सूनमध्ये पावसाळ्याच्या पाण्याचा त्रास होत असतो.

जर डम्पिंग ग्राउड झाले तर पावसाळ्यात या कचऱ्याची घाण पाण्यावाटे ग्रामस्थांच्या घरात जाऊन सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होणार असल्याने शासनाने या भागात डम्पिंग ग्राउंड टाकू नये, अशी यावेळी ग्रामस्थांनी जोरदार मागणी केली.

सुनावणीदरम्यान मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व महिलांची उपस्थिती होती. या वेळी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांच्या हरकती ऐकून घेतल्यानंतर याबाबत आम्ही नोंद करून घेतली असून वरिष्ठ पातळीवर तुमच्या भावना पोहोचवण्यात येतील, असे सांगितले.

डम्पिंग ग्राउंडचे आरक्षण रद्द झाले नाही, तर वेळप्रसंगी तीव्र स्वरूपाचे आंदोलन व न्यायालयात दाद मागणार, असे समीर शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

## माजी विद्यार्थ्यांकडून शालेय विद्यार्थ्यांना वस्तूंचे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

सर्व माजी विद्यार्थी एकवटून शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तू मिळाव्यात यासाठी स्वतःच्या आर्थिक कमाईतून खर्च करून पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीमधील सुमारे तीनशे विद्यार्थ्यांसाठी परीक्षेसाठी आवश्यक असणारे पॅड, प्रत्येक विद्यार्थ्यास पेन बॉक्स, कंपास पेटी अशा उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले आहे. नुकतीच शाळा सुरू झाल्यानंतर आवश्यक असणाऱ्या शालेय वस्तू मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर या वेळी हसू फुलले.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन शाळेचे अध्यक्ष खेळू वाजे, सचिव संजय रेडीज, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे यांनी केले. उपस्थित शिक्षकवृंद व संस्थेचे पदाधिकारी यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळेस काही तरी देणे लागतो ही भावना मनात ठेवून माजी विद्यार्थ्यांकडून शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी मोठे योगदान दिल्याबद्दल शाळेचे अध्यक्ष खेळू वाजे यांनी त्यांचे मनोगतात आभार व्यक्त केले.

तन्वीर पल्लवकर याने, इयत्ता पाचवीमधील सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप करणार आहे, असे सांगितले की तर नूतन घोंगे यांनी म्हटले की शिक्षणाची किंमत मला आज कळली असून सर्वांनी उच्चशिक्षित होणे आवश्यक आहे.

कार्यक्रमास सुदेश काते, सुषमा भात्रे, प्रकाश कजबले, देविदास महाडीक, निलम सुगदरे, रतन मालुसरे, प्रवीण धुमाळ, प्रियंका पाडगे, लक्ष्मण बैंकर लक्ष्मण महाडीक, सुरेश नाडकर, केतन भात्रे, देवेंद्र भौड, कल्पेश महाडीक, देवचंद महाडिक उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार भरत नाडकर यांनी व्यक्त केले.



# रेवदंडा पुलानजीक बुडालेले बार्ज हटविण्याची प्रक्रिया सुरू



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मच्छीमारांच्या होड्या तसेच छोट्या मोठ्या बार्ज यांना कुंडलिका समुद्रमार्गे व्यवस्थित प्रवास करता यावा यासाठी रेवदंडा पुलानजीक बुडालेले बार्ज बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

रेवदंडा पुलानजीक गेले काही वर्षापासून बुडालेले बार्ज तेथून जा–ये करणाऱ्या इतर लहान मोठ्या बोटी, बार्ज यांना धोकादायक ठरत होती. याबद्दल मच्छीमार व्यावसायिकांनी नाराजी व्यक्त केली होती. हे बार्ज समुद्र भरतीच्या वेळी पूर्णतः बुडत असल्याने रेवदंडा समुद्र किनारी कुंडलिका समुद्र खाडीतून ये–जा करत असलेल्या लहान मोठ्या बोटी, बार्ज यांच्या ते निदर्शनास येत नव्हती. त्यामुळे पाण्यातील बुडालेल्या बार्जला धडक बसून अपघाताची शक्यता नाकारता येत नव्हती.

गेले अनेक वर्षे संबंधितानी बुडालेले बार्ज काढण्याची कोणतीही खबरदारी घेतली नव्हती. त्यामुळे येथून जा–ये करताना इतर बोटी, बार्ज यांना सावधानता बाळगावी लागत असे तसेच कुंडलिका समुद्र खाडीत नवीन बोट अथवा बार्ज येथून जा–ये करत असल्यास बुडालेले बार्ज भरतीच्या वेळी दिसत नसल्याने व बुडालेल्या बार्जबद्दल माहिती नसल्याने अपघाताची शक्यता होती.

याबाबत बंदर रेवदंडा बंदर निरीक्षक सतिश देशमुख यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी सांगितले की, समुद्रात बुडालेले बार्ज काढून घेण्याबाबत संबंधित बार्ज मालकास सूचना केलेली, मात्र याबाबत बार्ज मालकाने सुरुवातीला कोणत्याही प्रकारचे सहकार्य दिले नाही. अखेर संबंधित बार्ज मालकांनी बुडालेले बार्ज काढून घेण्याची प्रक्रिया सुरू केल्याने स्थानिक मच्छीमार व्यावसायिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



## सदिच्छा भेट अन् आशीर्वाद

**खोपोली : भारतीय जनता पक्षात नुकतेच प्रवेश केलेले खोपोलीचे ज्येष्ठ उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते यशवंत साबळे यांनी बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची पनवेल येथील निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. आगामी पालिका निवडणुकीत रणनीती कशी असावी याबाबत साबळे यांनी रामशेठ ठाकूर यांच्याशी चर्चा केली. आगामी पालिका व सर्व निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे, असे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले. या वेळी माजी नगरसेवक अविनाश तावडे, युवा कार्यकर्ते सुहास वजरकर उपस्थित होते.** (छाया : जयवंत माडपे)

## नेरळ व्यापारी वेल्फेअर असोसिएशनकडून वृक्षारोपण

**नेरळ : प्रतिनिधी**

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नेरळ व्यापारी संघटनेकडून वृक्ष लागवड करण्यात आली आहे. माथेरानच्या डोंगर कुशीत वसलेल्या जुमापट्टी परिसरात मोकळ्या जागेत वृक्ष लागवड करण्यात आली असून वेगवेगळ्या जातीच्या झाडांची लागवड केल्याचे या वेळी संघटनेचे अध्यक्ष मनोहर अहिरे यांनी सांगितले.

माजी अध्यक्ष निलेश शहा म्हणाले, माणसाला जिवंत राहण्यासाठी ऑक्सिजनची गरज भासते. हा ऑक्सिजन झाडांमुळे आपल्याला मिळतो. उन्हात चटके लागले की, माणूस सावली शोधायलादेखील झाडाचा आधार शोधतो. झाडाचे सर्व महत्व जगाला समजते, परंतु झाडे लावून ती जगवण्यासाठी कोणी पुढे येत नाही आणि म्हणूनच आम्ही ही जनजागृती करीत आहोत.

नेरळ व्यापारी वेल्फेअर असोसिएशन आणि नेरळ वनविभागाच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी अंबा, कडुलिंब, जांभूळ, पेरू, आवळा, चिंच, बोर यांसारखी विविध फळझाडे आणि औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. नेरळ वनविभागाचे अधिकारी करडे यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले, तर व्यापारी संघटनेचे निलेश शाह, सदस्य प्रीतम गोरी, कमलेश ठक्कर, विशाल साळुंके, अरविंद कटारिया, मुकेश कटारिया, अमित जैन, रवी जैन, महेश कटारिया, जैद नजे, सनी कटारिया यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची निगा आणि ते जगवण्यासाठी संघटनेकडून निर्धार करण्यात आला असून झाडांची लागवड करणे पर्यावरणासाठी आणि आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे या वेळी सांगण्यात आले.



# माणगाव, इंदापूर बायपासचे काम जलदगतीने करावे –ॲड. साबळे

**माणगाव : बातमीदार**

माणगाव आणि इंदापूर येथील बायपास महामार्गाचे काम जलदगतीने करा; अन्यथा जनआंदोलन उभारुन माणगाव शहरातील जुन्या महामार्गावरुन एकही वाहन पुढे आणि मागे जाऊ न देता महामार्ग बंद करू तसेच माणगाव शहरातील ऐतिहासिक काळ नदीवरील पूल तोडण्याचा विचार मनातदेखील आणल्यास तीव्र विरोध करून महामार्ग बंद कर, असा इशारा शिवसेनेचे प्रवक्ते ॲड. राजीव साबळे यांनी माणगाव नगरपंचायतीमध्ये तातडीने बोलावलेल्या बैठकीत अधिकाऱ्यांना दिला.

माणगाव आणि इंदापूर बायपास महामार्गाच्या निविदा काढून कामास मंजुरी देण्यात आली आहे, मात्र अद्यापही वर्कऑर्डर देण्यात आलेली नाही. वर्कऑर्डर प्राप्त होताच बायपासचे काम सुरू करण्यात येणार आहे. दरम्यान, यापूर्वीचे ठेकेदार चेतक कंपनीची वर्कऑर्डर अजूनही रद्द करण्यात आलेली नाही तसेच या महामार्गावर लोणेरे येथील उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतरच या



बायपासची वर्कऑर्डर देता येईल, असे सहाय्यक कार्यकारी अभियंता अक्षरा डहाके यांनी सांगितले.

यावर ॲड. राजीव साबळे यांनी सांगितले की, माणगाव येथे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुनील तटकरे यांनी मुंबई गोवा–महामार्गाची पाहणी केली असता हा महामार्ग तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू करा. बायपास तातडीने पूर्ण करण्याची जबाबदारी सोपविण्यासाठी त्वरित पावले उचलली गेली नाहीत, तर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही दिला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहा महिन्यांपूर्वी आले असता महामार्गावरील अपघातात झालेल्या प्रवाशांच्या मृत्यूस जबाबदार धरत संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आणखी बळी या महामार्गावरील अपघातात गेले आहेत. याला संबंधित अधिकारी जबाबदार आहेत. माणगाव आणि इंदापूर येथील बायपास न झाल्याने अनेक जण वाहतूक कोंडीत तासन्तास अडकत आहेत. माणगाव शहरात दररोज ठिकठिकाणी अपघात होऊन नाहक बळी जात आहेत. बाजारपेठेमधून सर्वसामान्य माणसाला चालणे मुश्किल झाले आहे, असेही साबळे यांनी सांगितले.

काळ आणि गोद नदीवरील नवीन पूल करताना गणेश घाट, भादावकडे जाणारा रस्ता आणि स्मशानभूमीचे नुकसान झाले आहे ते नवीन बांधून द्यावे. बायपास करताना नाणोरे आणि भादाव या गावांचे नुकसान झाले आहे तेथे सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. बाजारपेठेतील गटारे दुरुस्त करावी. ढालघर फाटा ते जुने माणगाव गटारांची कामे अर्धवट अवस्थेत असल्याने ती तातडीने पूर्ण करावी, तेथील साईडपट्टीचे डांबरीकरण करावे, कचरा डेपोची घंटागाडी महामार्ग ओलांडून देण्यासाठी सर्व्हिस रोड सुरू करावा, महामार्ग आणि बायपास रस्त्यावर स्ट्रीट लाईट लावावेत, महामार्गाच्या अंतर्गत येणाऱ्या भादाव आणि नाणोरे रस्त्यावर स्ट्रीट लाईट लावावेत, प्रकल्पग्रस्तांना नुकसानभरपाई देण्यात यावी, जूनपूर्वी बायपास होण्यासाठी तातडीने काम सुरू करावे, बायपास सुरू करण्यापूर्वी मोरबा रोड ते मुंबई–गोवा महामार्ग आणि अन्य मार्गांची कामे सुरू करावी, सर्व्हिस रोड सुरू करावे, अशा मागण्या केल्या गेल्या.

या बैठकीला नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे, सहायक कार्यकारी अभियंता अक्षरा डहाके, कनिष्ठ अभियंता अश्विनी दळवी, सभापती कपिल गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक सचिन बोंबले, अजित तार्लेकर, दिनेश रातवडकर, राजेश मेहता, नंदिनी बामगुडे, सुनील पवार कार्यकारी अधिकारी संतोष माळी आदी उपस्थित होते.

# माथेरानमधील शार्लोट तलाव धबधबा पर्यटकांसाठी खुला



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील पर्यटकांचे आकर्षण असलेला व सुरक्षित असा शार्लोट तलाव धबधबा पर्यटकांसाठी खुला करण्यात आला आहे. धबधब्याशेजारील तारेचे कुंपण नगरपालिकेकडून काढून टाकण्यात आले आहे. यामुळे येथील दुकानदारांकडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

मागील काही दिवसांपूर्वी शार्लोट तलावात तीन पर्यटक बुडल्याची घटना घडली होती. यामुळे या तलाव परिसरात चेतावणी फलक लावून पर्यटकांना पाण्याजवळ जाण्यास बंदी घालण्यात आली होती. त्याचबरोबर तलाव ओव्हरफ्लो झाल्यानंतर सुरू असलेला सुरक्षित धबधबादेखील पर्यटकांसाठी तारेचे कुंपण करून बंद केला होता. याबाबत येथील दुकानदार व व्यावसायिक यांनी नाराजी व्यक्त करून हा सुरक्षित धबधबा बंद करू नये असे सांगितले होते. हा धबधबा बंद झाल्यास पर्यटक याठिकाणी येणार नाहीत आणि त्यामुळे आमच्या व्यवसायावर गदा येऊन आमचे खूप नुकसान होईल, असे सांगण्यात आले होते.

माथेरान शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांना ही माहिती मिळताच त्यांनी तत्काळ येथील मुख्याधिकारी तथा प्रशासक राहुल इंगळे यांची भेट घेऊन शार्लोट तलाव धबधबा पर्यटकांसाठी बंद करू नये. या सुरक्षित धबधब्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणात याठिकाणी जातात व त्यामुळे येथील व्यावसायिकांना, दुकानदारांना व्यवसाय मिळतो. शार्लोट तलावामध्ये उतरण्यास बंदी घालावी, परंतु पर्यटकांचे आकर्षण असलेला सुरक्षित शार्लोट तलाव धबधबा प्रशासनाने बंद करू नये, असे समजावून सांगितले.प्रशासनानेदेखील सकारात्मकता दर्शवित आणि विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पर्यटकांचे मुख्य आकर्षण असलेल्या धबधब्याशेजारील तारेचे कुंपण हटवले आणि शार्लोट तलाव धबधबा पर्यटकांसाठी खुला केला आहे. त्यामुळे समाधान व्यक्त होत आहे.



# नीरज चोप्राला सुवर्णपदक

## पॅरिसनंतर ओस्ट्रावातील स्पर्धेत सर्वोत्तम भालाफेक



**ऑस्ट्राव्हा : वृत्तसंस्था**

भारताचा ऑलिम्पिक भालाफेकपटू नीरज चोप्राने एका आठवड्यात सलग दुसऱ्या विजेतेपदावर आपले नाव कोरले. चेक प्रजासत्ताकातील ऑस्ट्राव्हा येथे झालेल्या गोल्डन स्पाइक ॲथलेटिक्स स्पर्धेत त्याने ८५.२९ मीटरचा सर्वोत्तम थ्रो करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

मागील दोन वेळा दुखापतीमुळे नीरज चोप्रा गोल्डन स्पाइक ॲथलेटिक्स स्पर्धेला मुकला होता. यंदा तो सहभागी झाला आणि अव्वल स्थानावर राहिला. नीरजने सुरुवात एका फाऊलने केली. यानंतर त्याने दुसऱ्या प्रयत्नात ८३.४५ मीटरचा थ्रो केला. तिसऱ्या प्रयत्नात त्याने ८५.२९ मीटरचा थ्रो केला. याच कामगिरीच्या जोरावर त्याने विजेतेपदाला गवसणी घातली.

८८.१६ मीटर भालाफेक करत नीरज चोप्रा याने या वर्षीच्या पहिले विजेतेपद पॅरिस डायमंड लीगवर आपल्या नावाची मोहोर उमटवली. २०२३च्या लॉसनेनंतर डायमंड लीग स्पर्धेतील नीरजचा हा पहिलाच विजय ठरला होता. नीरजने पहिल्याच प्रयत्नात ८८.१६ मीटर थ्रो करून चांगली सुरुवात केली. तेव्हा सर्वांच्या नजरा जर्मनीच्या ज्युलियन वेबरवर होत्या, पण वेबर त्याच्या पहिल्या प्रयत्नापेक्षा चांगली कामगिरी करू शकला नाही आणि ८६.२० मीटरसह दुसऱ्या क्रमांकावर राहिला.

# महिला राज्य बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंचे यश

**पनवेल : वार्ताहर**

वरिष्ठ महिला महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२५ चंदपूरमधील वरोरा येथील आनंद निकेतन महाविद्यालय या ठिकाणी झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारी योगिनी पाटील आणि पनवेल येथील उन्नती संग्रामसिंह परदेशी यांनी उत्तम कामगिरी केली.

उन्नती परदेशी हिने ६५ किलो वजन गटात सुवर्णपदक प्राप्त केले. प्राथमिक फेरीत तिने मुंबई उपनगर, उपांत्य फेरीत पुणे जिल्हा आणि अंतिम फेरीत क्रीडा प्रबोधिनी अकोलाच्या खेळाडूवर एकतर्फी विजय प्राप्त केला. तिची हैदराबादमधील तेलंगणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय एलिट वूमन बॉक्सिंग चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे.



५४ किलो वजन गटात योगिनी पाटील प्राथमिक फेरीत पुणे शहर व उपांत्य फेरीत मुंबईवर विजय मिळवून अंतिम फेरीत अहिल्यानगरकडून पराभूत झाल्याने तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले आहे. या दोन्ही स्पर्धकांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

## गचाळ क्षेत्ररक्षण आणि तळाची फलंदाजी ढेपाळल्याने पराभव –शुबमन गिल

**लीड्स : वृत्तसंस्था**

हेडिंग्ले येथे झालेल्या पहिल्या कसोटीत भारतीय क्रिकेट संघाला इंग्लंडकडून पाच गड्यांनी पराभूत व्हावे लागले. कर्णधार शुबमन गिल याने संघाच्या झालेल्या पराभवामागचे कारण सांगितले. आमच्याकडे संधी होती, मात्र आम्ही काही झेल सोडले तसेच तळाच्या फलंदाजांनी आवश्यक धावा जमवल्या नाही, हीच आमच्या पराभवाची प्रमुख कारणे ठरली, असे गिलने म्हटले आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच भारतीय संघाचे नेतृत्व करत असलेल्या शुबमन गिलकडे इंग्लंडमध्ये ऐतिहासिक कसोटी विजय मिळवण्याची संधी चालून आली होती. या पराभवानंतर गिल म्हणाला की, हा खरोखरच खूप चांगला कसोटी सामना झाला. आमच्याकडे संधी होती, मात्र आम्ही झेल सोडले तसेच तळाच्या फलंदाजांना अपेक्षित धावा जमवता आल्या नाहीत, पण या संघाचा मला अभिमान आहे. एकंदरीत आम्ही खूप चांगले प्रयत्न केले. दुसऱ्या डावात आम्ही ४३०च्या आसपास धावा जमवून डाव घोषित करण्याबाबत विचार करत होतो, मात्र तळाच्या फलंदाजांनी पुरेशा धावा काढता न आल्याने आमच्यासमोरील अडचणी वाढल्या.

गिल पुढे म्हणाला की, आम्ही तळाच्या फलंदाजांकडून अपेक्षित असलेल्या योगदानाबद्दल बोललो, मात्र आमचे तळाचे फलंदाज झटपट बाद झाले. पुढच्या सामन्यांमध्ये आम्हाला यात सुधारणा करावी लागणार आहे. या सामन्यात आमच्याकडून काही झेल सुटले. अशा प्रकारच्या खेळपट्ट्यांवर सहजपणे संधी मिळत नाही. आमचा संघ युवा आहे तसेच सध्या शिकत आहे. या बाबींवर पुढच्या काळात चांगले काम होईल, अशी अपेक्षा आहे.

## ऑस्ट्रेलियाचे धक्कातंत्र! लॅबुशेनला डच्चू, स्मिथही बाहेर

**सिडनी** : सध्या वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर असलेल्या ऑस्ट्रेलिया संघाने २५ जूनपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यासाठी आपला अंतिम ११ जणांचा संघ जाहीर केला आहे. केन्सिंग्टन ओव्हल येथे होणाऱ्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या संघात दोन मोठे बदल करण्यात आले आहेत. संघाचा प्रमुख फलंदाज मार्नस लॅबुशेनला बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे, तर अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथ दुखापतीमुळे या सामन्यात खेळू शकणार नाही. पहिल्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून उस्मान ख्वाजासोबत सॅम कॉन्स्टास डावाची सुरुवात करेल. कॅमेरून ग्रीन पुन्हा एकदा तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना दिसेल. दुखापतग्रस्त स्मिथच्या जागी चौथ्या क्रमांकावर जोश इंग्लिसला संधी देण्यात आली आहे. कर्णधार पॅट कमिन्सने संघात चार प्रमुख गोलंदाजांना स्थान दिले आहे. वेगवान गोलंदाजीची धुरा स्वतः कमिन्स, मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूड सांभाळतील, तर फिरकीची जबाबदारी अनुभवी नॅथन लायनवर असेल.















वर्ष २२ वे || ॐ श्री बाळकृष्णाय नमः || स्थापना २००३

# पुण्यतिथी सोहळा



श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर)



श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर)



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) पिताजी श्री. चांगू काना ठाकूर



स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि.नगर) माताजी श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर



श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी 'श्री. चांगू काना ठाकूर' यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०२, शके १९४७, शुक्रवार दिनांक २७/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री समर्थ दासबोध वाचन ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०३, विनायकी चतुर्थी, शके १९४७, शनिवार दिनांक २८/०६/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता पुण्यतिथी निमीत्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधू भगिनींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

## कार्यक्रम

| शुक्रवार, दिनांक २७/०६/२०२५ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा) बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, पखवाज : जयराम म्हात्रे (न्हावा) आत्माराम मोकल |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर), ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज (चिपळूण) श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी), श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी ०२.०० ते ०३.०० भजन | श्री विश्यंभर भजन मंडळ, गव्हाण गायक : हेमंत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ०३.०० ते ०५.०० भजन | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण – कोपर गायीका : श्रीमती. हिराबाई घरत, सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत, सौ. चंद्रभागा घरत, श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ – कोपर गायीका : सौ. सुप्रिया घरत वादक : तुषार घरत, टाळकरी – सौ. शितल घरत, कोपर |
| सायं. ०५.०० ते ०६.०० भजन | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर श्री. हर्षल फडके. पखवाज : श्री. पवन फडके |
| सायं. ०६.०० ते ०७.०० आरती | माऊलींची आरती |
| सायं. ०७.०० ते ०८.०० | एकनाथी भागवत ग्रंथ वाचन / ध्यान |
| सायं. ०८.०० ते ०९.०० भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर बुवा : श्री. वसंतशेठ पाटील पखवाज : गौरव म्हात्रे आणि तुकाराम कोळी |
| सायं. ०९.०० ते ११.०० कीर्तन | विश्ववारकरी सेनेचे महाड तालुका अध्यक्ष मा. ह.भ.प. श्री.शाममहाराज मिरगळ साधकारी मंडळी गायक–ह.भ.प. श्रावण महाराज मिरगळ, ह.भ.प. श्री. प्रमोद महाराज मेस्त्री, ह.भ.प. एकनाथ महाराज मिरगळ |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर (भजन–सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

| शनिवार, दिनांक २८/०६/२०२५ | |
|---|---|
| सकाळी ०९.०० ते १०.०० भजन | नादब्रम्हा भजन मंडळ (रांजणपाडा–खारघर) बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी, वसंतशेठ पाटील (कोपर), ज्ञानेश्वर म्हात्रे (गव्हाण), गणपत ठाकूर (कोपर), भाऊ ठाकूर, (शि.नगर) नितीन ठाकूर (त. पाडा), श्री. महेश पाटील (न्हावा), पखवाज : गौरव म्हात्रे |
| सकाळी १०.०० ते १२.०० प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज (नंदेश्वर) |
| दुपारी १२.०० वाजता | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

*** कार्यक्रमाचे ठिकाण ***

श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण,
ता. पनवेल, जि. रायगड.

*** व्यवस्थापक ***

देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)
शिवाजीनगर- गव्हाण- न्हावेखाडी- कोपर (संचलित)

*** संयोजक ***

श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)
आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com